आला आला जबरदस्त हिवाळा
। स्वेटर्स । जॅकेट । 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०६.११.२०२५ | अंक नं. १७९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

सर्व दागिन्यांची प्रतीग्रॅम
घडणावळ ₹ 888/-*
डबल फायदा
+
जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी
चक्र फ्री *
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

उच्च दर्जा.. योग्य किंमत..
हिच तर आमची खासियत..
Available In Top Brands
Hettich HÄFELE
GRASS blum
ITALICA ebco
NEW BOMBAY Since 1972
KITCHENS & WARDROBE
Ahilyanagar Off.: Excel Arcade, Near HDF Bank, Laltaki, Ahilynagar.
Pune Off.: 1, Patil Plaza, Mitra Mandal Chowk, Pune.
Cell.: 98909 85601 I 98222 94670.

# शिर्डी येथील 'साईबाबां'च्या विषयी व्हिडीओद्वारे खोटी माहिती पसरवली

## युट्युब चॅनल चालविणाऱ्याविरुद्ध साई संस्थानकडून गुन्हा दाखल

नगर - शिर्डीच्या साईबाबांच्या विषयी तेलगु भाषेतील व्हिडीओद्वारे खोटी माहिती पसरवण्यात आली असून, संबंधित युट्युब चॅनलवर असे २७ व्हिडीओ प्रसारित करण्यात आले आहेत. त्यामुळे साई भक्तांच्या धार्मिक भावना दुखावल्या असून, या प्रकरणी साई संस्थानच्या फिर्यादीवरून संबंधित युट्युब चॅनल चालविणाऱ्या अजय नावाच्या व्यक्तीवर शिर्डी पोलिस ठाण्यात ५ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत साई संस्थानचे अधिकारी रोहिदास अशोक माळी (रा. शिर्डी, ता. राहाता) यांनी शिर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हटले आहे की, तेलगु भाषेतील युट्युब चॅनल Aham brahmasmi यावर ३० ऑक्टोबर पूर्वी श्री साई बाबा यांच्याविषयी आक्षेपार्ह व खोटी माहिती असलेले व्हिडीओ प्रसारित करण्यात आले आहेत. हे तब्बल २७ व्हिडीओ असून त्याद्वारे साईबाबांची बदनामी करण्यात आली. हे व्हिडीओ तेलगु भाषिक साई भक्त प्रमोद कुमार चंदा व इतरांच्या निदर्शनास आले. त्यांनी त्या व्हिडीओतील तेलगु भाषेतील माहितीचा इंग्रजी भाषेत अनुवाद करून व्हिडीओच्या लिंक व तो मजकूर साई संस्थानला पाठविला. तसेच याबाबत कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. संस्थानने याबाबत तातडीने दखल घेत साई भक्तांच्या धार्मिक भावना दुखावणाऱ्या Aham brahmasmi या तेलगु भाषेतील युट्युब चॅनलचा चालक अजय (पूर्ण नाव, पत्ता माहित नाही) याच्याविरुद्ध शिर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी बीएनएस कलम ३५२, ३५३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

प्रथम पुण्यस्मरण
कष्टाळू, प्रेमळ, शिस्तप्रिय, वक्तशिर, उत्तम संघटक, मुत्सद्दी, हजरजबाबी, धोरणात्मक निर्णय घेणारे असे आमचे मामा



स्व.प्रा.देवेंद्र रभाजीराव कवडे (सर)
जन्म- दि. ०९/०६/१९४८ मृत्यु- दि. ०६/११/२०२४
चंदनापरी झिजून तुम्ही... मिळवून दिला आम्हा मान...
तुमच्या कार्याला, तुमच्या स्मृतीला आमचा शतशः प्रणाम !
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली
* दुःखांकित *
अभिनंदन दिलीप वाळके व परिवार

डिसेंबरच्या सुट्टीत कुठे आहात तुम्ही..
बेस्ट ऑफ दुबई-अबुधाबी
1,41,000
७ दिवस
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
9112384842, 9850063432

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
100% JOB ASSISTANCE
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING
ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769
An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE

मजबूत व टिकाऊ
उत्पादनांची विश्वासार्ह श्रृंखला!
Varsha
अटूट रिश्ता जिंदगी भर का



UNBREAKABLE HOUSEHOLD | FURNITURE | GARDEN PIPES
SPRINKLERS | HDPE PIPES | CLEANING PRODUCTS
200+ PRODUCT RANGE
- AUTHORISED DISTRIBUTOR -
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जैन मंदिर ट्रस्ट भूखंड प्रकरणी राष्ट्रसंत आनंदऋषीजी म.सा. यांच्या समाधीसमोर शपथ घेऊन या १८ प्रश्नांची उत्तरे द्या : मनोज गुंदेचा यांचे सुभाष मुथा यांना आव्हान

### ... नाही तर किरण काळे शहर लोकप्रतिनिधींची बिनशर्थ माफी मागतील

नगर – जैन मंदिर ट्रस्ट भूखंड हडप करत त्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यालय थाटल्याचा आरोप ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी केला होता. धर्मदाय आयुक्तांकडे तशी तक्रार त्यांनी केली होती. त्यानंतर ट्रस्ट अध्यक्ष सुभाष मुथा, भाडेकरू गणेश गोंडाळ यांनी काळे यांचे आरोप खोटे, दिशाभूल करणारे असल्याचा आरोप केला होता. त्यावर आता जैन समाजाचे मनोज सुवालाल गुंदेचा यांनी अनेक प्रश्न उपस्थित करत ट्रस्टचे अध्यक्ष मुथा, भाडेकरू गोंडाळ, शहर लोकप्रतिनिधींना काही प्रश्न केले आहेत. तुमच्यात नैतिकता शिल्लक असेल तर राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज साहेबांच्या समाधीसमोर शपथ घेऊन या १८ प्रश्नांची पुराव्यांसह उत्तरे द्या, असे खुले आव्हान दिले आहे. या सर्व प्रश्नांची तुम्ही खरी आणि पुराव्यांसह उत्तर दिली तर किरण काळे हे शहर लोकप्रतिनिधी, समाजाची नाक रगडून बिनशर्त माफी मागतील. सर्व आरोप मागे घेतील, असे मनोज गुंदेचा यांनी म्हटले आहे.

### गुंदेचा यांचे जाहीर सवाल :

१) खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती समाजाला देऊन तुम्ही कोणता अर्थपूर्ण स्वार्थ साधत आहात ?

२) मंगूबाई हिरालाल व्होरा यांनी भूखंड धर्म कार्यासाठी दान केला होता. १९८७ ला ट्रस्टचे नाव उताऱ्यावर लागले आहे. आज पर्यंत ट्रस्टने या जागेत कोणते धर्म कार्य केले ?



३) तुम्ही सांगितले की इथे कधीही कोणीही साधू, संत आले नाही. मग या जागेचा तुम्ही केवळ वैयक्तिक अर्थपूर्ण हितसंबंधा साठीच आजवर वापर केला का ? तुम्ही देणगीदार मयत मातेची फसवणूक नाही केली का ?

४) मृत्युपत्रात सात भाडेकरूंची नोंद आहे. अन्य सहा भाडेकरू जागा सोडून का गेले ?

५) त्यांना कुणी पळवून लावले ? त्या भाडेकरूंना जागा कोणी खाली करायला लावली ?

६) सहा भाडेकरू गेले मात्र एक तथाकथित स्वयंघोषित भाडेकरूच कसं काय त्या ठिकाणी राहिला ?

७) मृत्युपत्रात सातवा भाडेकरू हरिभाऊ महादू गोंडाळ हा होता. त्याला केवळ एक खोली २८ रुपये भाड्याने दिली होती. तो मयत झाला आहे. त्यानंतर ती खोली ट्रस्टच्या ताब्यात का नाही घेतली ?

९) मृत्युपत्रात ही जागा कोणासही कोणत्याही कारणासाठी देऊ नये असा स्पष्ट उल्लेख देणगीदाराने केलेला असून देखील गणेश गोंडाळ नामक व्यक्तीने या भूखंडाचा ताबा कसा काय घेतला ? त्याच्या वडिलांच्या ताब्यात असणारी एक खोली अचानक संपूर्ण ५००० स्क्वेअर फिटच्या भूखंडात कशी काय परावर्तित झाली ? मृत्युपत्रामध्ये गणेश गोंडाळ याचा भाडेकरू म्हणून कुठे उल्लेख आहे का ?

१०) त्यासाठी धर्मदाय आयुक्त यांची नियमाप्रमाणे पूर्वपरवानगी घेतली आहे का ? ती तुम्ही समाजाला दाखवाल का ?

११) या जागेवर असणारी हुंडेकरी चाळ बुलडोजर लावून रात्रीतून कोणी पाडली ?

१२) या जागेवर राजकीय कार्यालय थाटत केलेले बांधकाम ट्रस्टने केले आहे की अन्य कोणी ? या ठिकाणी शहर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत राष्ट्रवादीचे कार्यालय सुरू असल्याचे टेम्पो भरून फोटो आम्ही दाखवले ते खोटे आहेत का ?

१३) या बांधकामाची मनपाची परवानगी घेतली आहे का ? ती तुम्ही समाजाला दाखवाल का ?

१४) राजकीय कार्यकर्ता असणाऱ्या सध्याच्या तथाकथित भाडेकरू कडून आजवर ट्रस्टच्या अध्यक्षांनी किती रक्कम बेकायदेशीर रित्या घेतली आहे ?

१५) ट्रस्ट अध्यक्ष यांनी स्वतःच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी राजकीय नेत्या बरोबर तडजोड करून ट्रस्टची जागा संगनमत करून परस्पर विक्रीचा घाट घातला होता का ?

१६) ट्रस्ट विक्रीचा निर्णय घेतल्याचे तुम्ही सांगितले. जागा विक्रीची जाहीर नोटीस ही ट्रस्टने जारी केली होती. ती प्रसिद्ध करण्यापूर्वी धर्मदाय कार्यालयाची परवानगी घेतल्याचा पुरावा तुम्ही समाजाला कधी देणार ?

१७) मुळात ही जागा कधीही कुणाला विकू नये असे मृत्युपत्रात स्पष्ट म्हटलेले असताना, ते तुम्हाला ज्ञात असताना देखील तुम्ही हा घाट कोणत्या राजकीय नेत्याच्या दबावातून घातला ? विक्री नोटीस कोणी द्यायला भाग पाडले?

१८) धर्म कार्यासाठीच्या ट्रस्टचे तुम्ही विश्वस्त, रखवालदार आहात की शहर लोकप्रतिनिधींचे प्रवक्ते ?

# ‘जैन मंदिर’ भूखंडप्रकरणी माजी आ. रवींद्र धंगेकर, किरण काळे यांनी घेतली सहधर्मदाय आयुक्तांची भेट

### ट्रस्ट अध्यक्ष सुभाष मुथा यांच्यासह अन्य ट्रस्टींना पदावरून हटवून गुन्हे दाखल करण्याची केली मागणी

नगर – श्री ऋषभ संभव जिन जैन श्वेतांबर संघ (जैन मंदिर), कापड बाजार या ट्रस्टचा धार्मिक कार्यासाठी असणारा भूखंड हडपून त्या ठिकाणी राजकीय कार्यालय थाटल्याचा आरोप ठाकरे शिवसेनेचे शहरप्रमुख किरण काळे यांनी केला होता. याप्रकरणी माजी आ. रवींद्र धंगेकर आणि काळे यांनी सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांची भेट घेऊन ट्रस्ट अध्यक्ष सुभाष मुथा, अन्य ट्रस्टींना पदावरून हटवून गुन्हे दाखल करण्याची तक्रार केली आहे. याबाबत चौकशी करण्याचे आश्वासन यावेळी सह धर्मदाय आयुक्त यांनी दिले.



जैन मंदिर ट्रस्ट भूखंड प्रकरणी माजी आ.रवींद्र धंगेकर, किरण काळेंनी सहधर्मदाय आयुक्तांची भेट घेवून ट्रस्ट अध्यक्ष सुभाष मुथा, अन्य ट्रस्टींना पदावरून हटवून गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.

काळे यांनी केलेल्या आरोपांचे मुथा यांनी ट्रस्टच्या वतीने खंडन केले होते. त्यानंतर काळे यांनी ही मागणी केली आहे. मंगूबाई व्होरा यांनी हा भूखंड केवळ धर्म कार्यासाठीच देणगी दिला होता. तो कोणालाही विकू नये अथवा अन्य करण्यासाठी देऊ नये याचा मृत्युपत्रामध्ये स्पष्ट उल्लेख असल्याचा पुनरुच्चार काळे यांनी केला आहे.

तक्रार अर्जात काळे यांनी म्हटले आहे, या गंभीर प्रकरणाचे तात्काळ सखोल चौकशी आदेश निर्गमित करावेत. ट्रस्ट अध्यक्ष सुभाष मुथा आणि अन्य सर्व ट्रस्टींना तात्काळ पदावरून हटवण्यात यावे. त्यांना ट्रस्टमध्ये पदाधिकारी होण्यासाठी कायमस्वरूपी अपात्र करण्यात यावे. ट्रस्टचे कामकाज आपल्या विशेष देखरेखी खाली करण्यात यावे. त्याकरिता प्रशासकाची नियुक्ती करावी.

अध्यक्ष मुथा, अन्य ट्रस्टींवर गुन्हा दाखल करा: काळेंनी तक्रारीत म्हटले आहे, ट्रस्ट अध्यक्ष सुभाष मुथा आणि अन्य ट्रस्टींनी जाणून–बुजून, कट कारस्थान करून सदर कृत्य केल्याचे स्पष्टपणे दिसते आहे. सबब त्यांच्यावर कलम ६६, ६७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा. सदर हडप केलेला भूखंड गणेश गोंडाळ, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सत्ताधारी लोकप्रतिनिधी यांच्या कडून तात्काळ खाली करून घेण्याचे आदेश करावेत.

# नगर-पुणे महामार्गावर भंगार घेवून जाणारा मालट्रक पकडला; ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

नगर – मालकी हक्काचे कोणतेही पुरावे जवळ नसताना संशयास्पद रित्या भंगार साहित्य वाहतूक करणारा मालट्रक नगर तालुका पोलिसांच्या पथकाने पकडला आहे. ही कारवाई ५ नोव्हेंबर रोजी पहाटे ३.२० च्या सुमारास नगर – पुणे महामार्गावर चास घाटात करण्यात आली असून या कारवाईत ९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नगर तालुका पोलिस ठाण्याचे पथक नगर पुणे महामार्गावर रात्र गस्त घालत असताना, पहाटे ३.२० च्या सुमारास चास घाटात एक मालट्रक (क्र. एमएच २१ एक्स ९४७७) संशयास्पदरीत्या उभा असल्याचे पोलिसांना दिसले. पोलिसांनी तत्काळ ट्रक थांबवून चालक हकीम अकबरखान पठाण (वय २५, जालना) याच्याकडे चौकशी केली.

तपासात ट्रकमध्ये भंगार साहित्य (लोखंडी पत्रे व इतर सामग्री) आढळून आले. चालकाकडे मालाच्या वाहतुकीसंबंधी कोणतेही परवाने किंवा मालकीचे कागदपत्र नव्हते. पोलिसांनी ट्रक व भंगार साहित्य असा एकूण ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पो.कॉ. विजय साठे यांच्या फिर्यादी वरून ट्रकचालकाविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोठला परिसरात ८० किलो गोमांस पोलिसांनी पकडले

नगर – शहरातील कोठला झोपडपट्टी परिसरात तोफखाना पोलिसांच्या पथकाने छापा टाकत १७ हजार ४०० रुपये किंमतीचे ८० किलो गोमांस जप्त केले आहे. ५ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांना कोठला झोपडपट्टी परिसरात गोमांस विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली होती. या कारवाईत आरोपी फिरोज जमशेर शेख (वय ५०, रा. कोठला, झोपडपट्टी) याला पकडून त्याच्याकडून अंदाजे १७ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार,आरोपीने आपल्या घरातच गोमांस साठवून विक्रीस ठेवले होते. या प्रकरणी आरोपीविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार सुजय हिवाळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर,पोलीस अंमलदार रियाज इनामदार, भानुदास खेडेकर, योगेश चव्हाण, सुनील चव्हाण, नितीन उलगमुले, सुरज वाबळे, सुधीर खाडे, सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतीश त्रिभुवन, सुजय हिवाळे, बाळासाहेब भापसे, दादासाहेब रोहकले यांच्या पथकाने केली.

# पतसंस्थेकडून ठेवीदाराची १ कोटी १० लाख रुपयांची फसवणूक

### संचालक मंडळ, व्यवस्थापकासह २२ जणांवर गुन्हा दाखल

नगर – पतसंस्थेत जास्त व्याजाचे आमिष दाखवून ठेवी घेतल्या, मात्र ठेवींची मुदत संपूनही ठेवीची रक्कम परत न करता ठेवीदार व त्याच्या कुटुंबियांची १ कोटी १० लाख ८ हजार ३२३ रुपयांची फसवणूक केल्याची घटना पारनेर तालुक्यातील निघोज येथील मळगंगा नागरी सहकारी पतसंस्थेत घडली आहे. या प्रकरणी संस्थेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ, व्यवस्थापक, विशेष वसुली अधिकारी अशा २२ जणांवर ५ नोव्हेंबर रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत ठेवीदार भाऊसाहेब लिंबाजी थोरात (वय ६२, रा. पिंप्री जलसेन, ता.पारनेर, हल्ली रा. खराडी, पुणे) यांनी पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांच्या कुटुंबियांना मळगंगा नागरी सहकारी पतसंस्थेच्या पदाधिकारी व संचालक मंडळाने ठेवींवर ज्यादा व्याजदर देण्याचे आमिष दाखवत त्यांच्या कडून ठेवी घेतल्या. त्या ठेवींची मुदत संपल्यावर फिर्यादी हे संस्थेत पैसे काढण्यासाठी गेले असता त्यांना व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.रोख रक्कम शिल्लक नाही, भरणा येणार आहे. काही दिवसांत पैसे देवू असे सांगत टोलवाटोलवी केली.

फिर्यादीने याबाबत पदाधिकारी व संचालक मंडळाशी संपर्क साधला असता त्यांनीही वेगवेगळी कारणे सांगत वेळ मारून नेली. अनेकदा पाठ पुरावा करूनही ठेवींची सुमारे १ कोटी १० लाख ८ हजार ३२३ रुपये एवढी रक्कम पतसंस्थेकडून देण्यास टाळाटाळ करण्यात आली. संस्थेकडून आपली फसवणूक करण्यात आली असल्याचे लक्षात आल्यावर भाऊसाहेब थोरात यांनी ५ नोव्हेंबर रोजी पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादी वरून पोलिसांनी संस्थेचे चेअरमन प्रभाकर नारायण कवाद, व्हाईस चेअरमन रामदास बाबुराव लंके, संचालक बाळासाहेब गणाजी लामखडे, मच्छिंद्र जिजाबा लंके, नामदेव हरिभाऊ पठारे, रायचंद खंडू गुंड, भाऊसाहेब विठोबा लामखडे, संतोष बन्सी येवले, भास्कर तुकाराम शेळके, राजेंद्र भागा लाळगे, प्रकाश शिवराम कवाद, वसंत जानकू बुचडे, मुकुंद रामचंद्र निघोजकर, शंकर रामचंद्र वराळ, संजय बबन सोनवणे, पुष्पा प्रकाश पांढरकर, विजया लहू वागदरे, अविनाश पंढरीनाथ गांढरे, रामदास बाबुराव रोहिले, व्यवस्थापक दिलीप पोपटराव वराळ, पिंप्री जलसेन शाखाधिकारी संपत गणाची लामखडे, विशेष वसुली अधिकारी व तज्ञ संचालक संतोष बाबुराव साबळे या २२ जणांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३१६ (४), ३१६ (५), ३(५) सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास स.पो.नि. नितीन खंडागळे हे करत आहेत.

## समीर इंगळे यांचे दु:खद निधन



नगर – किंग्जगेट वंजारगल्ली येथील रहिवासी समीर अशोक इंगळे (वय ४२) यांचे ६ नोव्हेंबर रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे आई, भाऊ, भावजय, २ बहिणी, पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे. पंकज अशोक इंगळे यांचे ते धाकटे बंधू होत.

## जगदीश येवलेकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – बागडे मळा बालिकाश्रम रोड येथील रहिवासी जगदीश तुकाराम येवलेकर (वय ७९) यांचे ६ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ६ नोव्हेंबर रोजी त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते येथील कापड बाजारातील अनंत कलेक्शनचे संचालक होते. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शंतनू व सुशील यांचे ते वडील होत.

## मनोज सुगंधी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – विनायकनगर, महालक्ष्मी कॉलनी येथील रहिवासी मनोज नारायण सुगंधी (आप्पा) (वय ६०) यांचे ५ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी काटवन खंडोबा येथील स्मशानभूमीत करण्यात आला. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ सुना, २ नातू असा परिवार आहे. सुमीत, अमीत सुगंधी यांचे ते वडील होत.

## नाना बागुल यांचे दिर्घ आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील भाजीपाल्याचे व्यावसायिक नाना धनाजी बागुल (वय ६१) यांचे दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, सुन, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. युवराज बागुल व दादा बागुल यांचे धाकटे बंधू, विशाल बागुल यांचे वडील, मंगेश, उमेश, संजय, निलेश व लोकेश बागुल यांचे चुलते होत.



महानगरपालिका निवडणूक बाबत मनसेची बैठक घेण्यात आली. यावेळी पदाधिकारी उपस्थित होते.

# महानगरपालिकेची निवडणूक मनसे संपूर्ण ताकतीने लढविणार

नगर – महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक संपूर्ण ताकतीने लढविण्याचा निर्णय जिल्हाध्यक्ष सचिन डफळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पदाधिकारी बैठकीत घेण्यात आला. सदर बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांची व इच्छुक उमेदवारांचे मते जाणून घेण्यात आली. तसेच नवीन प्रभाग रचनेचा निवडणूक आराखडा तयार करण्यात आला असून शहरातील सर्व प्रभागांमध्ये इच्छुकांची मोर्चेबांधणी करून बैठकीची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. मनसे आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी सज्ज असून पूर्ण ताकदीने हि निवडणूक लढवणार असल्याचे मनसेचे शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र राशिनकर यांनी म्हटले आहे.

शहरातील विविध समस्या व नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम या बैठकीत घेण्यात आले. सद्यस्थितीत शहराची अवस्था बकाल बनत चालली आहे, शहरातील काही ठराविक भागाचा विकास होत आहे आणि इतर ठिकाणी विकासाच्या नावाखाली अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे अधिकाऱ्यांना हाताशी धरून करण्यात येत आहे. शहरात कोणतेच नियोजनबद्ध काम होताना दिसून येत नसून मनमानी पद्धतीने सर्वत्र शहराची नांगरट केल्यासारखी अवस्था करून ठेवली आहे. त्यातील अनेक कामे एकाच ठेकेदाराला देण्यात आल्यामुळे त्याची मनमानी सामान्य नागरिकांना वेठीस धरणारी आहे. याला वाचा फोडण्याचे काम आगामी काळात हाती घ्यावे लागणार आहे, तसेच आगामी निवडणूक स्वबळावर लढवायची की आघाडी बरोबर जाऊन लढवायची याबाबत मते जाणून घेण्यात आली, याबाबतचा अहवाल वरिष्ठांना पाठवण्यात येणार आहे व पुढील दिशा वरिष्ठांच्या आदेशाने ठरविण्यात येणार आहे.

सदर बैठकीस जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र राशिनकर, उपजिल्हाध्यक्ष मनोज राऊत, विद्यार्थी सेना राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अनिता दिघे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड, वाहतूक सेना शहराध्यक्ष अशोक दातरंगे, शहर सचिव डॉक्टर संतोष साळवे, शहर उपाध्यक्ष तुषार हिरवे, शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे, शहर उपाध्यक्ष संदीप चौधरी, शहर उपाध्यक्ष किरण रोकडे, विभाग अध्यक्ष प्रवीण गायकवाड, प्रशांत जाधव, प्रमोद ठाकूर, अभिषेक कलमदाने, अंबरनाथ भालसिंग, आरती उफाडे, श्रद्धा खोंडे आदी उपस्थित होते.

# गॅस कटरने ‘एटीएम’ फोडून १९.६२ लाखांची रोकड पळविली

### पोलिस पोहचण्यापूर्वी टाटा हॅरीअर कारमधून चोरटे झाले पसार

नगर – आण्णा हजारे यांच्या राळेगणसिध्दी (ता. पारनेर) गावात असलेले बँक ऑफ महाराष्ट्रचे एटीएम ५ नोव्हेंबर रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास अज्ञात चार चोरट्यांची फोडून त्यातील १९ लाख ६२ हजारांची रोख रक्कम लंपास केली. चोरटे चोरी करत असतानाच या चोरीची माहिती पारनेर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तातडीने राळेगणसिद्धी गावाकडे धाव घेतली मात्र ते तेथे पोहचण्याच्या काही मिनिटे अगोदर चोरटे टाटा हॅरीअर कारमधून पसार झाले.

याबाबत बँकेचे शाखा व्यवस्थापक किरण नारायण आवारी (वय ३३, रा. रांधे, ता. पारनेर) यांनी पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. राळेगणसिद्धी गावात बँक ऑफ महाराष्ट्रची शाखा असून त्या बाहेरच एटीएम मशीन बसविलेले आहे. ५ नोव्हेंबर रोजी पहाटे ३ च्या सुमारास एका टाटा कंपनीच्या हॅरीअर कारमधून ४ चोरटे बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएमजवळ पोहचले. त्यांनी गॅस कटरने एटीएम फोडून त्यातील चार पैकी दोन बॉक्समधील १९ लाख ६२ हजार रुपये एवढी रक्कम लांबविली. चोरटे ही चोरी करत असताना एटीएम च्या सुरक्षा प्रणाली द्वारे शाखा व्यवस्थापक यांना मोबाईल वर अलर्ट मेसेज गेला. तो पाहून त्यांनी तातडीने पारनेर पोलिसांना फोन करून माहिती दिली. ही माहिती मिळताच रात्रगस्त घालणारे पोलिस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ व पोलिसांचे पथक राळेगण सिद्धी कडे रवाना झाले. पोलिसांनी गावातील नागरिकांना फोन करून चोरट्यांना अडविण्यास सांगितले. मात्र भीती पोटी कोणी पुढे जाण्यास धजावले नाही. चोरट्यांनी १८ मिनिटांत एटीएम फोडून त्यातील रोकड घेवून पोलिस तेथे पोहचण्या पूर्वी काही मिनिटे अगोदर टाटा हॅरीअर कारमधून पळ काढला.

सीसीटीव्ही फुटेजनुसार टाटा कंपनीच्या हॅरीअरमधून आलेल्या वाहनाचा नंबर औरंगाबाद आरटीओ पासिंगचा असून त्याचा पुर्ण नंबर आढळून येत नाही. पोलिसांनी श्वान पथक तसेच इतर यंत्रणांच्या मदतीने आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी बँकेचे शाखा व्यवस्थापक किरण आवारी यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३३१ (४), ३०५ (अ), ३२४ (४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ हे करत आहेत.

# भरदिवसा घरातून २ लाख ६६ हजारांच्या दागिन्यांची चोरी

नगर – भरदिवसा महिलेच्या घरात घुसून बॅगेत ठेवलेले २ लाख ६६ हजारांचे सोन्याचांदीचे दागिने व रोख रक्कम अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील घोडकेवाडी (घोसपुरी) येथे ४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ६ या कालावधीत घडली.

याबाबत रंजना साहेबराव घोडके (वय ६०, रा.घोडकेवाडी, घोसपुरी, हल्ली रा. वाघोली, पुणे) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या मुलाच्या कामानिमित्ताने सध्या वाघोली, पुणे येथे वास्तव्यास आहेत. त्यांच्या मुलाचे लग्न असल्याने गावाकडील धार्मिक विधी, सुवासिनी जेऊ घालणे आदी करण्यासाठी त्या घोडकेवाडी येथे आल्या होत्या. ४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ६ या कालावधीत त्या धार्मिक विधी करण्यात व्यस्त असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरात घुसून त्यांची नजर चुकवून घरातील बॅगेत ठेवलेले २ लाख ६६ हजारांचे सोन्याचांदीचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला. सायंकाळी हा प्रकार लक्षात आल्यावर त्यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात धाव घेत माहिती दिली. काही जणांवर संशयही व्यक्त केला आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे हे करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### पपई खा निरोगी राहा...

निरोगी राहण्यासाठी योग्य आहार घेणे आवश्यक आहे. कारण योग्य आहार आणि जीवनशैली आपल्याला निरोगी आणि रोगमुक्त ठेवते. निरोगी राहण्यासाठी, तुम्हाला निरोगी खाण्याच्या सवयी देखील अंगीकारल्या पाहिजेत. दररोज रिकाम्या पोटी पपई खाल्ल्याने तुमचे आरोग्य सुधारेलच पण अनेक आजारांपासूनही आराम मिळेल. पपईला आवश्यक पोषक तत्वांचे पॉवरहाऊस म्हणून ओळखले जाते, म्हणून ते तुमच्या आहारात समाविष्ट करणे खूप फायदेशीर आहे. सकाळी नाश्त्यापूर्वी पपई खाण्यास सुरुवात केली तर तुमच्या आरोग्यात बदल दिसून येईल. पपई खाणे हे पचनसंस्थेसाठी वरदान मानले जाते. त्यात पपेन नावाचे एंजाइम असते, जे प्रथिने पचवण्यास मदत करते. शिवाय, पपईतील फायबर बद्धकोष्ठतेपासून मुक्त होण्यास मदत करते. दररोज पपई खाल्ल्याने अपचन, गॅस आणि आम्लता यासारख्या पोटाच्या समस्या दूर होतात. दररोज पपई खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. पपई हे व्हिटॅमिन सीचा एक उत्तम स्रोत आहे. मध्यम आकाराच्या पपईमध्ये संत्र्यापेक्षा तीन पट जास्त व्हिटॅमिन सी असते. व्हिटॅमिन सी शरीराची रोगांशी लढण्याची क्षमता मजबूत करते, ज्यामुळे सर्दी आणि संसर्गाशी लढण्यास मदत होते.

## पाककला

### साबुदाणा पराठा

**साहित्य :** शेंगदाणे दोन टेबलस्पून, जिरे अर्धा टीस्पून, आले किस एक टीस्पून, हिरव्या मिरच्या एक टीस्पून, सेंधव मीठ अर्धा टीस्पून, लिंबाचा रस दोन टीस्पून, पाणी, भाजलेला साबुदाणा २०० ग्रॅम, उकडलेले आणि मॅश केलेले बटाटे, कोथिंबीर, साबुदाण्याचे पीठ, तूप दोन टेबलस्पून

**कृती :** सर्वात आधी मिक्सरमध्ये कोथिंबीर, शेंगदाणे, जिरे, आले, हिरव्या मिरच्या आणि तूप एकत्र करा. त्यात मीठ, बर्फाचे तुकडे, लिंबाचा रस आणि ६० मिली पाणी घाला. गुळगुळीत पेस्ट बनवा आणि बाजूला ठेवा. आता दुसऱ्या मिक्सर भांड्यात २०० ग्रॅम भाजलेले साबुदाणे घालून बारीक पावडर बनवा. हे मिश्रण एका भांड्यात काढा. आता शेंगदाण्याचे मिश्रण आणि १०० मिली पाणी घालून पीठ मळून घ्या. पीठाचा एक भाग घ्या आणि एक गोळा तयार करा. लाटून घ्या. गरम तव्यावर ठेवा आणि मध्यम आचेवर १-२ मिनिटे बेक करा. उलटा आणि तूप लावा. नंतर दुसऱ्या बाजूला वळा, तूप लावा आणि दोन्ही बाजूंनी सोनेरी तपकिरी होईपर्यंत बेक करा.

## वास्तू

### किती अगरबत्त्या लावाव्यात?

पूजेदरम्यान नेहमीच अगरबत्ती लावल्या पाहिजेत. यामुळे पूजेचे पूर्ण फायदे मिळतात. या काळात नेहमीच दोन अगरबत्ती लावल्या पाहिजेत. असे मानले जाते की पूजेदरम्यान दोन अगरबत्ती लावल्याने कुटुंबाला सर्व देव-देवतांचे आशीर्वाद मिळतात. अगरबत्ती लावल्याने सूक्ष्मजीवांचा नाश होतो. असा विश्वास आहे की पूजेसाठी तयार केलेल्या अगरबत्तीमध्ये अनेक संयुगे असतात जे कीटकांना दूर करण्यास मदत करतात.

## सौंदर्य

१० मिनिटांत हातांवर सुंदर गोल मेहंदी डिझाईन काढण्यासाठी मधोमध मोठं फूल काढावे. त्याभोवती छोट्या पाकळ्या आणि वेलसदृश नक्षी काढा. मनगटापर्यंत हलकी पाने किंवा बिंदूंची रचना करावी. सणासुदीला किंवा लग्नात अतिशय उठून दिसते.

## सल्ला

सूपमध्ये चिरलेले बटाटे किंवा बटाट्याचे तुकडे घातल्याने ते घट्ट होते. बटाट्याचा स्टार्च नैसर्गिकरित्या सूप घट्ट करतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, रोहिणी २४।३४, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३५ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे.

**वृषभ :** व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**मिथुन :** आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थती उद्‌भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल. शत्रूंपासून सावध राहा.

**कर्क :** काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. विशेष वित्तीय अडचणींवर चिंतन.घरात मंगल कार्याचा योग.

**सिंह :** जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल.

**कन्या :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**तूळ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. तुमच्या सार्मथ्यात वाढ.

**वृश्चिक :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**धनु :** रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल. आळस करू नये.

**मकर :** आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**कुंभ :** घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.

**मीन :** सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. मतभेदांपासून लांब रहा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. १२१० सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | | ४ | |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| ५ | | ■ | ६ | | ■ | ■ | ७ |
| | ■ | ८ | ■ | ९ | | | ■ |
| १० | | | ■ | | ■ | ■ | ११ |
| | ■ | ■ | ■ | १२ | | | |
| ■ | १३ | १४ | | | ■ | ■ | |
| १५ | | | ■ | ■ | १६ | | |

**आडवे शब्द :-** १) ++ + ++++ + तुम ऐसा मैने सोचा था (गाणे) ५) ++ घटा (चित्रपटाचे नाव) ६) ++ का पंछी (चित्रपटाचे नाव) ७) + और मेरा हाथी (चित्रपटाचे नाव) ९) जुन्या काळातील एक अभिनेत्री १०) यात अमिताभ बच्चन, हेमामालिनी आहेत १२) सुनील दत्त, साधना, मुक्री, प्रेम चोप्रा, के. एन. सिंग यांचा एक चित्रपट १३) + ++ + तेरे बिना भी क्या जीना (गाणे) १५) +++ महुआकार (अभिनेत्री) १६) प्यासा +++ (चित्रपटाचे नाव)

**उभे शब्द :-** १) सलमानखान, श्रीदेवी यांचा एक चित्रपट २) ++ देव (जुन्या काळातील मराठी अभिनेत्री) ३) मेरे ++ +++++ ++ हमसफर (गाणे) ४) देव आनंद, कल्पना कार्तिक, गीताबाली यांचा एक चित्रपट ८) राजेश खन्ना, मुमताज यांचा एक चित्रपट ११) फिरोजखान, विनोद खन्ना, आदित्य पांचोली, माधुरी दीक्षित, टिनू आनंद, अनुराधा पटेल, अंजन श्रीवास्तव, अमला, अमरीश पुरी यात आहेत १३) ओम शांती ++ (चित्रपटाचे नाव) १४) बीस ++ बाद (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलन : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** कवडी कवडी माया जोडी, रुपया लाख करोड जब आवे यमजीका तडाखा चलो लंगोटी छोड.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मगर आणि सुसर हे प्राणी एकच आहेत का?

एका अनुमानानुसार सुसर ही उत्तर भारतीय उपखंडात विकसित झाल्याचे संकेत आहेत. जीवाश्म सुसरीचे अवशेष शिवालिक टेकड्यांमध्ये आणि नर्मदा नदीच्या खोऱ्यात असलेल्या प्लायसीन उत्खननांमधे आढळून आले आहेत. सध्या भारतीय उपखंडाच्या उत्तर भागाच्या मैदानी प्रदेशातील नद्यांत त्यांचे वास्तव्य आहे. वसंत ऋतूमध्ये मादी सुसर घरटे खोदण्यासाठी एकत्र जमतात. त्या २०-९५ अंडी घालतात आणि पावसाळ्यास सुरुवात होण्याआधी त्या घरट्यांतील अंडी उबवतात. अंडी उबविल्यानंतर पहिल्या वर्षामध्ये त्या उथळ पाण्यात राहतात परंतु जसजशी ती पिल्ले वाढतात, तसतशी त्या तेव्हा पाण्याच्या ठिकाणावर जातात.

याउलट मगरीचा समावेश सरीसृप वर्गाच्या क्रोकोडिलिया गणात होतो. आशिया, आफ्रिका, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया खंडांत मगरी आढळून येतात. क्रोकोडिलिया गणात लिगेटर, केमन व घडियाल या सरीसृप प्राण्यांचा समावेश करतात. लिगेटर अमेरिका व आशियात, केमन अमेरिकेत तर घडियाल हे आशियात आढळतात. मगरीच्या अनेक जाती असून भारतात २ प्रजाती आणि ३ जाती आहेत. भारतात त्याच्या क्रोकोडिलस या प्रजातीत क्रोकोडिलस पॅल्युस्ट्रिस आणि क्रोकोडिलस पोरोसस अशा दोन जाती आहेत, तर गॅव्हिलिस प्रजातीत गॅव्हिलिस गँजेटिकस ही एकच (घडियाल) जाती आहे. भारतात जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश व पंजाब ही राज्ये वगळता इतर राज्यांत मगरी आढळतात. क्रोकोडिलस पॅल्युस्ट्रिस आणि गॅव्हिलिस गँजेटिकस या जाती गोड्या पाण्यात आढळतात, तर क्रोकोडिलस पोरोसस ही जाती मचूळ पाण्यात आढळते. गोड्या पाण्यातील मगर सु. 5 मी. लांब, तर मचूळ पाण्यातील सु. ६ मी.पेक्षा अधिक लांब असते. पूर्ण वाढ झालेल्या मगरीचे वजन २००-२५० किग्रॅ. असते. डोके, मान, धड आणि शेपटी असे तिच्या शरीराचे भाग असतात. डोक्याचा अग्रभाग त्रिकोणी अथवा गोलाकार असून त्याला मुस्कट म्हणतात.

मुस्कटावर नासाछिद्रे असतात. वरच्या आणि खालच्या जबड्यांवर मजबूत व तीक्ष्ण लहानमोठे दात असतात. दातांची संख्या सुमारे ७६ असून ते वरचेवर गळून पडतात व त्यांच्या जागी नवीन दात येतात. वरच्या जबड्यातील दोन्ही बाजूंचे पाचवे दात मोठे असून खालच्या जबड्यातील दात वरच्या जबड्याच्या खाचांमध्ये घट्ट बसतात. जबडा बंद केल्यावर हे मोठे दात बाहेर आलेले दिसतात. जीभ रुंद व जाड असून खालच्या जबड्याला जोडलेली असते. नासाछिद्रे, डोळे व कर्णछिद्रे एका सरळ रेषेत असल्याने मगर शरीर पाण्याखाली ठेवून तरंगत राहते. नासाछिद्रांवर झडपा असतात. त्यामुळे पाणी श्वासमार्गात शिरत नाही. डोळ्यांवर असलेल्या निमेषक पटलामुळे डोळ्यांचे संरक्षण होते आणि त्यामुळे पाण्याखाली मगरीला दिसू शकते. शरीराचा प्रवाहरेखित आकार, लहान अग्रपाद, लहान पश्चपाद आणि लांब शेपटी पोहण्यासाठी अनुकूल असतात. थोडक्यात, पाण्यात वावरण्यासाठी मगरीचे शरीर अनुकूलित झालेले असते.

अंड्यात वाढ होत असताना पिलाच्या मुस्कटाच्या टोकावर एक अंड-दंत येतो. दोन-तीन महिन्यांनंतर पिलू अंड-दंताच्या साहाय्याने कवच फोडून बाहेर येते. अंड्यांचे आणि पिलांचे रक्षण मादी करते. या काळात मनुष्याची चाहूल लागताच मादी प्रक्षुब्ध होते.

मगरीच्या धडाला अग्रपाद आणि पश्चपाद यांच्या दोन जोड्या असतात. अग्रपादाला पाच बोटे असून ती पडद्याने जोडलेली असतात. पश्चपादाची बोटे सुटी असतात. मगर पाण्यात संथ गतीने पोहते व जमिनीवर खुरडत चालते. मात्र क्षुब्ध झाल्यास ती चारही पायांवर शरीर वर उचलून काहीशा वेगाने चालण्याचा प्रयत्न करते. फुप्फुसे स्पंजासारखी असतात. मगरीच्या हृदयाला चार कप्पे आणि अवस्कर छिद्र उभे असून नराला एक शिस्न असते. अन्य सरीसृप प्राण्यांमध्ये हृदयाला तीन कप्पे असून नरांना दोन शिस्ने असतात.

मगर मांसाहारी असून मासे हे तिचे मुख्य अन्न आहे. पक्षी व जमिनीवरील प्राणी हेही ती खाते. पाणी प्यायला आलेली हरिणे व लहान गुरे यांवर झडप घालून मगर शिकार करते. पाण्यात तरंगत असताना एखादा प्राणी अथवा पक्षी आटोक्यात आल्यावर मगर त्याला पकडून पाण्याखाली नेऊन खाते.

## अतिआत्मविश्वास

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका राजेशाही बागेत एक दयाळू माळी राहत होता जो माकडांचा रक्षक देखील होता. बागेतील माकडे माळीने त्यांची चांगली काळजी घेतल्याबद्दल कृतज्ञ आणि आभारी होते.

एके दिवशी, एक धार्मिक उत्सव आयोजित केला जात होता. माळीने या कार्यक्रमात सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली आणि तो सात दिवसांसाठी बाग सोडणार होता. त्याआधी, त्याने माकडांच्या राजाला संदेश पाठवला. त्याच्या अनुपस्थितीत झाडांना पाणी देण्याची विनंती केली. माकडांच्या राजाने ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली.

माळी बागेतून निघून गेल्यावर, माकडांच्या राजाने त्याच्या सर्व सहकारी माकडांना एकत्र केले आणि त्यांना झाडांना पाणी देण्याची सूचना केली. त्याने असेही स्पष्ट केले की माळीने खूप प्रयत्न करून पाणी गोळा केले आहे, म्हणून त्यांनी ते हुशारीने वापरावे. त्याने माकडांना पाणी देण्यापूर्वी वनस्पतींच्या मुळांची खोली मोजण्याचा सल्ला दिला, जेणेकरून जास्त पाणी वाया जाऊ नये.

पण माकडांनी उलट केले. त्यांनी त्यांच्या मनाप्रमाणे झाडांना पाणी दिले आणि या प्रक्रियेत संपूर्ण बाग नष्ट केली.

तेवढ्यात, एक प्रवासी तिथून गेला आणि त्याने ते दृश्य पाहिले. त्याने माकडांचा नाश पाहिला आणि त्यांना सल्ला दिला, झाडे नष्ट करू नका. तुमचा हेतू चांगला होता, पण मूर्खपणाने ते वाईट बनवले. संपूर्ण बाग नष्ट झाली. माळी परत आल्यानंतर त्याला घडलेला संपूर्ण प्रकार समजला. बिचारा माळी हताश होऊन बसला व दुःख व्यक्त केले.

तात्पर्य : कधीकधी अतिआत्मविश्वास खूप मोठे नुकसान करू शकतो.



## जीवन का अमृत (भाग १)

### समर्पित शिष्यों

समर्पित शिष्यों के कर्मों का बोझ लेकर उसे स्वयं वहन करता है क्योंकि प्रकृति के नियम की किसी न किसी रूप में तो क्षतिपूर्ति करनी ही पड़ेगी। इसके साथ यह भी है कि कोई भी शिष्य यह नही चाहेगा कि उसकी गलतियों का फल उसके गुरु को भुगतना पड़े। इसके विपरित शिष्य को चाहिए कि वह भाव-भक्ति से गुरु की आराधना करना सीखे। यदि वह ऐसा करता है तो निःसंदेह उसे दुखों से छुड़ाने या उन्हें हल्का करने के लिये हर संभव सहायता उस तक पहुँचती है। उसकी आत्मा भी जीवन की खुराक पाकर और है। फिर भी कुछ चीजें ऐसी हैं जहाँ इंसान का कोई वश नहीं चलता. अमृत पीकर मजबूत हो जाती जैसे:-

१. जीवन के सुख-दुख, शारीरिक व मानसिक रोग एवं कष्ट २. अमीरी-गरीबी, धन-ऐश्वर्य, सत्ता, दरिद्रता और नीचता ।

३. मान-सम्मान, यश-अपयश, उपेक्षा एवं तिरस्कार । ये सब इस जीवन के साथ जुड़े हैं और पहले से निश्चित हैं। मनुष्य के सभी प्रयत्न या तो अधिकाधिक सुख-सुविधाएँ जुटाने के लिए होते हैं या दुखों और कडवाहटों से बचने के लिये होते हैं। वह यह महसूस नहीं करता कि जीवन एक बादल की तरह क्षणभंगुर है, छाया मात्र है केवल एक छलावा या मृग मरीचिका जो तपते हुए मरूस्थल में भटकते पथिक को हमेशा भरमाती या छलती रहती है।

किसी संत- सत्गुरु के सत्संग और भजन-अभ्यास द्वारा जीव को संसार और इसके पदार्थों का मायावी स्वरूप समझ में आता है और उसमें अनंत जीवन का स्रोत फूट पड़ता है जिसे पाकर उसका रोम-रोम तृप्त हो जाता है और उसे हमेशा के लिये संतोष मिल जाता है। जिन्दगी तब उसके लिये एक मधुर गीत बन जाती है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### शांती

हमें एक-दूसरे को क्षमा करना होगा, तभी हम शांति से जी सकेंगे। - लिओ टॉलस्टॉय

शांति अपने विशुद्ध रूप में एक आंतरिक मौन है, जो सत्य की शक्ति से परिपूर्ण है। शांति एक सभ्य समाज की प्रमुख विशेषता है और किसी भी समाज के सदस्यों की सामूहिक चेतना के माध्यम से उसका चरित्र जाना जा सकता है।

शांति की चुनौती स्वयं किसी प्रश्न से कम नहीं है। वह प्रश्न है, 'क्या मनुष्य स्वभाव से ही हिंसक है या अहिंसक ?' यदि उत्तर हिंसा है तो शांति के अस्तित्व का प्रश्न ही नहीं पैदा होता। शांति इतनी भ्रामक हो चली है कि लोग अब इसके अस्तित्व को भी भूलने लगे हैं। मन की शांति के बारे में बात तो सभी करते हैं, परंतु इसका वास्तव में अर्थ क्या है?

शांति एक सकारात्मक व शक्तिशाली गुणवत्तापूर्ण ऊर्जा है, जो निरंतर एक अक्षय स्रोत से प्रसारित होती रहती है। शांति शुद्ध विचारों, भावनाओं तथा कामनाओं के मेल से बनी है। यह कलह के खोल को भेदती है और स्वभाववश स्वचालित रूप से व्यक्तियों तथा वस्तुओं को संतुलित रूप में ले आती है। यह मानवीय संबंधों पर मलहम की तरह काम करती है और कठिन समय में शक्ति व सहजता का स्रोत बनती है। भय व तनाव, नापसंद व अरुचि का अभाव तथा सद्भाव, स्नेहपूर्ण दयालुता की उपस्थिति ही शांति है। यह सौम्य सजगता का एक रूप है, जो दूसरों को परखने या उनकी आलोचना करने के स्थान पर उन्हें समझते हुए आरोग्य प्रदान करता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

आज सकाळीच बायकांच्या गप्पा कानावर पडल्या....
भाजीपाला, किराणा पासुन वर्ल्ड कप सुद्धा
आपल्यालाच आणावा लागतोय...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेच्या उपाध्यक्षपदी कोणाची नियुक्ती झाली आहे? - उर्जित पटेल

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारातून आरोग्य संवर्धन

### मसाले

मिरेपूड करून ठेवली तर त्याचा स्वाद, गुणधर्म व गंध कमी होतो. कोशिंबीर, आमटी, भाजी, लोणचे व पापडामध्ये मिऱ्याचा वापर करावा. यामुळे पदार्थाची चव वाढते. मिरच्यांपेक्षा मिरे कमी दाहक व अधिक गुणकारी असल्याने अनेक लोक आहारामध्ये त्याचा वापर जास्त करतात. आरोग्य चांगले राखण्याच्या दृष्टिकोनातून मिरे वापरणे हितकारक आहे. थंडीमुळे अंग गारठून आखडले असेल, तर मिरे पाण्यात बारीक वाटून त्याचा लेप अंगावर लावावा. यामुळे त्वचेमध्ये उष्णता निर्माण होऊन स्नायू व्यवस्थित कार्य करतात. रांजणवाडी खूप सुजून डोळ्याची पापणी दुखत असेल, तर मिरे पाण्यात वाटून त्याचा सूक्ष्म कल्क रांजणवाडीवर लावावा. म्हणजे रांजणवाडी त्वरित पिकून फुटते. त्यातील पू निघून गेल्यामुळे आराम मिळतो. फक्त हा लेप लावताना तो डोळ्यात जाणार नाही याची मात्र काळजी घ्यावी. वैद्यांचा सल्ला अवश्य घ्यावा. एखाद्या व्यक्तीला तापामुळे किंवा दुःखद घटना ऐकल्याने बेशुद्धावस्था आली असेल, तर अशा वेळी त्या व्यक्तीच्या नाकामध्ये मिरीचे सूक्ष्म चूर्ण फुकले असता त्याला असंख्य शिंका येऊन त्याची बेशुद्धावस्था नाहीशी होऊन तो शुद्धीवर येतो. अजीर्ण, अपचनाचा त्रास होत असेल, तर सुंठ, मिरी, पिंपळी (त्रिकटू) याचे चूर्ण मधातून चाटण केल्यास अपचनाचा त्रास होत नाही. खूप येऊन अशक्तपणा वाटत असेल व मन बेचैन झाले असेल, तर अशा वेळी चिराईताबरोबर मिरेपूड घेतल्यास मनाची बेचैनी कमी होऊन ताप निघून जातो.

मिऱ्याचे अतिरिक्त सेवन झाले, तर जठर, आतड्यांमध्ये दाह होणे, पोटात दुखू लागणे, उलट्या होणे, मूत्राशय व मूत्रनलिकेत तीव्र दाह होणे, गुदनलिकेत व शौचाच्या जागी दाह होणे आणि त्वचेवर शीतपित्ताच्या गाठी होणे ही लक्षणे दिसून येतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ

### भारतातून २७० बुद्धिबळपटूंच्या सहभागाने रंगणार बुध्दीचा महासंग्राम



शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेते अनुप देशमुख यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन करण्यात आले.

नगर - शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित व अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित अखिल भारतीय खुली आंतरराष्ट्रीय मानांकित बुद्धिबळ स्पर्धा अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड येथे सुरू झाली. या बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेते अनुप देशमुख यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन करण्यात आले. या वेळी बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त शाम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, स्वप्निल भंगुरकर, नवनीत कोठारी, दत्ता घाडगे, रोहित आडकर, देवेंद्र ढोकळे, सुनील जोशी, संजय खडके, अनुराधा बापट, रोहिणी आडकर तसेच पंच विनिता श्रोत्री (पुणे), श्रद्धा वीचवेकर (पुणे), पवन राठी (सोलापूर), शार्दुल टापसे (सातारा), शिरीष इंदुरकर (नागपूर), विजय चोरडिया (पुणे), प्रवीण जोशी (संभाजीनगर) यांच्यासह खेळाडू, पालक आणि नागरिक उपस्थित होते.

स्पर्धेचे प्रस्ताविक सचिव यशवंत बापट यांनी केले. त्यांनी सांगितले की या स्पर्धेत देशभरातील खेळाडू सहभागी झाले आहेत. आतापर्यंत अहिल्यानगर, पुणे, मुंबई, नागपूर, ठाणे, नाशिक, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, जळगाव, जालना, वर्धा, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, चंद्रपूर, रायगड तसेच आंध्र प्रदेश, गुजरात, जम्मू-काश्मीर, कर्नाटक, राजस्थान, उत्तर प्रदेश, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल येथून मिळून २७० खेळाडूंचा सहभाग निश्चित झाला आहे.

या स्पर्धेत इंटरनॅशनल मास्टर राहुल संगमा (गुजरात), अनुप देशमुख (महाराष्ट्र) यांच्यासह अनेक दिग्गज खेळाडूंचा सहभाग आहे. त्यामुळे ही स्पर्धा दर्जेदार आणि रोमहर्षक ठरणार आहे.

या वेळी अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन तर्फे आयोजित या क्लासिकल फेडरेशन चेस टूर्नामेंट २०२५ मध्ये सर्व वयोगटातील खेळाडू सहभागी होत आहेत. साडेपाच वर्षांचा सर्वात लहान बुद्धिबळपटू आणि ८३ वर्षांचे ज्येष्ठ खेळाडू या स्पर्धेत आपली बुद्धी आणि कौशल्य आजमावणार आहेत. जिल्हा बुद्धिबळ संघटनेचा मानस म्हणजेच शहरातून जास्तीत जास्त ग्रँडमास्टर घडवणे, आणि होतकरू व तरुण बुद्धिबळ खेळाडूंना प्रोत्साहन करणे. ह्या अतिशय दर्जेदार खेळाडू सहभागी झाले आहेत असे त्यांनी सांगितले.

स्पर्धेचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले, तर प्रकाश गुजराथी यांनी आभार मानले.

अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील तरुण खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळणार असून, नगर जिल्हा बुद्धिबळाच्या क्षेत्रात नवे पर्व सुरू झाले असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# भगवान विष्णूंच्या ९ अवतारांचे दर्शन घडवणारा 'दीपोत्सव'

### श्री एकदंत गणेश मंडळाचा अनोखा उपक्रम



नगर - अहिल्यानगरच्या एकदंत कॉलनीत श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दीपावलीच्या निमित्ताने 'दीपोत्सव सोहळा' उत्साहात पार पडला. यावेळी मंडळाने पारंपरिक प्रकाशोत्सवाला सामाजिक व आध्यात्मिक संदेशाची जोड देत भगवान विष्णूंच्या नऊ अवतारांचे दर्शन दीपांच्या माध्यमातून साकार केले.

एकूण ५०१ दिव्यांच्या लखलखाटात सजलेला हा दीपोत्सव केवळ दृष्टीसुखद नव्हे, तर भक्तिभाव आणि सृजनशीलतेचे दर्शन घडवणारा ठरला. श्री एकदंत गणेश मंदिरात गणपती बाप्पांची महाआरती करून दीप प्रज्वलनाचा शुभारंभ झाला. मंदिर परिसरात आकर्षक फुलांच्या रांगोळ्या, रंगीत दिवे आणि सुंदर सजावट यामुळे परिसर अवर्णनीय तेजाने उजळून निघाला.

या वर्षीच्या दीपोत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे मंडळाने भगवान विष्णूंचे नऊ अवतार - मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण आणि बुद्ध - हे प्रत्येक अवतार दिव्यांच्या कलात्मक मांडणीतून साकारले. प्रत्येक अवताराच्या प्रतिकात्मक रचनेसह संबंधित रंगसंगती आणि फुलांची सजावट यामुळे दिव्यांची मांडणी एक आगळावेगळी आध्यात्मिक अनुभूती देणारी ठरली.

या उपक्रमाचा हेतू केवळ दीप लावण्यापुरता मर्यादित नसून, त्यातून समाजाला 'धर्म, नीती, आणि सृजनशीलतेच्या मार्गावर चालण्याचा' संदेश देणे हा होता. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, भगवान विष्णूंचे प्रत्येक अवतार समाजातील अधर्म, अन्याय आणि अंधःकार नष्ट करण्याचे प्रतीक आहे. आजच्या काळात हे अवतार समाजाला पुन्हा सत्य आणि सदाचाराकडे नेणारे दीप आहेत.

मंडळाच्या महिला कार्यकर्त्यांनी या अवतारांची मांडणी तयार करताना परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी गणपती बाप्पांची महाआरती करण्यात आली

दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री एकदंत गणेश मंडळाने दीपोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक आणि आध्यात्मिकतेचा संगम साधला आहे.

# हरदिन मॉर्निंग ग्रुपच्यावतीने भिंगारमध्ये श्री गुरुनानक देवजी जयंती साजरी




भिंगार येथील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने शीख धर्माचे संस्थापक श्री गुरुनानक देवजी महाराज यांची ५५६ वी जयंती (गुरुपूरब) साजरी करण्यात आली.

नगर - भिंगार येथील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने शीख धर्माचे संस्थापक श्री गुरुनानक देवजी महाराज यांची ५५६ वी जयंती (गुरुपूरब) साजरी करण्यात आली. भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथे सकाळी आयोजित या कार्यक्रमात हरदिन ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ आणि प्रज्योतसिंग सागू यांच्या हस्ते गुरुनानक देवजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या अभिवादन कार्यक्रमासाठी सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, सचिन चोपडा, ज्ञानेश्वर अनावडे, रतन मेहेत्रे, दीपकराव धाडगे, जहीर सय्यद, अभिजीत सपकाळ, सुधीर कपाळे, विलास आहेर, अविनाश जाधव, विठ्ठल राहिंज, दिलीप गुगळे, अशोकराव पराते, दीपकराव घोडके, मनोहरराव दरवडे, शशिकांत घिगे, सरदारसिंग परदेशी, संजय भिंगारदिवे, संतोष हजारे, रमेशराव साके, जालिंदर अळकुटे, रवी ताठे, अशोकराव दळवी, अविनाश पोतदार, नवनाथ वेताळ, रामनाथ गर्जे, भरत दंडोरे मेजर, रमेश कोठारी, सुहास देवराईकर, योगेश चौधरी, दशरथराव मुंडे, प्रकाश देवळालीकर, मुन्ना वाघस्कर, देविदास गंडाळ, संतोष रासकर, सुधीर दहिफळे, संजय इस्सर, गोकुळ भांगे आदींसह ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, गुरुनानक देवजी हे केवळ शीख धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर ते मानवतेचे प्रतीक होते. त्यांनी समाजातील भेदभाव, जातीपातीच्या भिंती दूर करून एक परमेश्वर आणि समानतेचा संदेश दिला. आजच्या काळात त्यांच्या शिकवणीची सर्वाधिक गरज आहे. समाजातील सर्व घटकांनी त्यांच्या विचारांना आत्मसात करून सामाजिक एकता, सद्भावना आणि सेवा या मूल्यांवर चालण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

सचिन चोपडा म्हणाले की, गुरुनानक देवजींनी नाम, दान आणि सेवा हा जीवनाचा मार्ग दाखविला. त्यांचा सरबत्त दा भला म्हणजे सर्वांच्या कल्याणाचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. आपण धर्म, भाषा, पंथ यापेक्षा मानवतेला अग्रक्रम दिला पाहिजे. गुरुनानक देवजींचे जीवन म्हणजे प्रेम, करुणा आणि शांततेचा दीपस्तंभ आहे. त्यांच्या विचारांवर चालणे म्हणजेच खऱ्या अर्थाने त्यांना अभिवादन ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या जयंती सोहळ्याप्रसंगी ज्ञानेश्वर अनावडे, विलासराव आहेर, प्रज्योतसिंग सागू यांनीही आपल्या भाषणातून गुरुनानक देवजींच्या शिकवणीचे स्मरण केले. तर गुरुनानक देवजींच्या विचारांचे समाजात जागर करुन समतेचा संदेश देण्यात आला.



नगर येथील सनातन धर्म सभेतर्फे काळेश्वर मंदिरात त्रिपुरा पौर्णिमेच्या निमित्ताने ३ हजार दीप प्रज्वलित करून पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी सनातन धर्मसभेचे मंत्री दिनकर देशमुख, रमेश देशपांडे, समीर उपाध्ये, चकोर मुळे, श्रीपाद तांबोळी, सुविधा तांबोळी, गीता मंडळाचे सदस्य ॲड. अच्युतराव पिंगळे आदी उपस्थित होते.





अहिल्यानगर येथील गुरुद्वारा भाई दयासिंगजी, गोविंदपुरा मध्ये धन धन श्री गुरु नानक देवजी महाराज यांची ५५६ वी जयंती म्हणजेच प्रकाश गुरुपूरब उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम पार पडले.

# गुरुनानक देवजी महाराज जयंतीनिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम

नगर - अहिल्यानगर शहरातील संजयनगर परिसरात श्री गुरुनानक देवजी महाराज यांच्या ५५६ व्या जयंतीनिमित्त (प्रकाश गुरु पूरब) उत्साह, श्रद्धा व भक्तिमय वातावरणात उत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने संजयनगर मित्र मंडळाच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळपासूनच गुरबाणी कीर्तन, नामस्मरण, सत्संग, व गुरुनानक देवजींच्या शिकवणींवर आधारित प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमस्थळी सर्वत्र वाहे गुरु जी का खालसा, वाहे गुरु जी की फतेह अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला होता. या दिवशी मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील भाविक, नागरिक तसेच विविध समाजघटकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी संजयनगर मित्र मंडळाचे सुनील सिंग जुनी, मिलन सिंग जुनी, करण सिंग जुनी, शंकर पंडित, सईद बेग, अमु शेख, सागर सिंग जुनी, सतनाम सिंग जुनी, राज सिंग जुनी, आकाश सिंग जुनी, कुलदीप सिंग बावरी, राहुल सिंग जुनी, राजेश सिंग टाक, धरम सिंग जुनी, रोहित पंडित आदींसह परिसरातील नागरिक, महिला व युवक सहभागी झाले होते.

गुरुनानक देवजी महाराज यांच्या शिकवणी-प्रमाणे सर्व मानव एक आहेत, सेवा हीच खरी साधना आहे हा संदेश देत मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक एकतेचा व मानवतेचा अनोखा संदेश या सोहळ्याद्वारे दिला. या जयंती सोहळ्यामुळे संजय नगर परिसर पूर्णपणे आध्यात्मिक व भक्तिमय वातावरणाने उजळून निघाला. कार्यक्रमानंतर भाविकांनी मोठ्या श्रद्धेने गुरुनानक देवजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून समाजात शांतता, बंधुता व ऐक्य राहावे, अशी प्रार्थना केली.



संजयनगर परिसरात श्री गुरुनानक देवजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त (प्रकाश गुरु पूरब) उत्साह, श्रद्धा व भक्तिमय वातावरणात उत्सव साजरा करण्यात आला.

# गुरु नानक देवजी महाराज यांची ५५६ वी जयंती शहरात उत्साहात साजरी

### प्रकाश गुरुपूरबनिमित्त गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपुरा येथे भाविकांची दर्शनास गर्दी

नगर - अहिल्यानगर येथील गुरुद्वारा भाई दयासिंगजी, गोविंदपुरा मध्ये धन धन श्री गुरु नानक देवजी महाराज यांची ५५६ वी जयंती म्हणजेच प्रकाश गुरुपूरब उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम पार पडले.

२८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत रोज सकाळी प्रभात फेऱ्या शहरातील विविध मार्गांवरून काढण्यात आल्या. संगतांनी सहभागी होऊन वाहेगुरु, वाहेगुरु, धन गुरू नानक या जयघोषात नगर शहरातील वातावरण भक्तीमय केले. संगतांच्या सहभागातून सांझा अखंड पाठ साहिब करण्यात आली. त्यानंतर रोज संध्याकाळी कीर्तन दरबार आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये कीर्तन जथा भाई गुरविंदर सिंगजी (रुद्रपूर वाले) व हजूरी रागी भाई अमृतसिंगजी जथ्था यांनी तीन दिवस सतत आपल्या मधुर स्वरांमधून गुरबाणीचे अमृतवचन सादर करून भाविकांना मंत्रमुग्ध केले.

गुरुद्वारा परिसरात तीन दिवस लंगर सेवा सुरु होती, ज्यामध्ये हजारो भक्तांनी सहभागी होऊन प्रसाद ग्रहण केला. तसेच सेवादारांच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. ज्यामध्ये अनेक भाविकांसह युवकांनी उत्साहात रक्तदान केले. या समारंभात समाजातील विशेष कार्य आणि योगदानाबद्दल नारंग ब्रदर्स यांना समाज रत्न पुरस्कार पंजाबी परिवाराच्या वतीने प्रदान करण्यात आला.


या जयंती सोहळ्यानिमित्त आमदार संग्राम जगताप यांनी गुरुद्वाराला भेट देऊन दर्शन घेतले. जयंतीच्या शुभेच्छा देताना आमदार जगताप म्हणाले की, आपली भूमी ही साधू-संतांच्या पदस्पर्शाने पावन झाली आहे. धर्माचे विचार पुढे घेऊन जात, पंजाबी समाजाने नेहमीच संकट काळामध्ये राष्ट्र उभारणीत मदत केली आहे. श्री गुरुनानक देवजी महाराज यांची शिकवण, विचारधारा पुढच्या पिढीकडे घेऊन जायची आहे. त्यांच्या विचारातून चांगल्या कामाची प्रेरणा व ऊर्जा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच खासदार निलेश लंके यांनी दर्शन घेऊन समाजबांधवांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी पोलीस उपाधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, आर्मी इंटेलिजन्सचे मेजर चंद्रशेखर, माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी उपमहापौर गणेश भोसले, संजय चोपडा, योगीराज गाडे उपस्थित होते.

गुरुद्वारा समितीचे आणि शीख समाजाचे अध्यक्ष स. बलदेव सिंग वाही यांनी उपस्थित सर्व भाविक, कीर्तन जथ्था, सेवादार तसेच सर्व सहकार्य करणाऱ्या संस्थांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, गुरु नानक देवजींचा उपदेश किरत करो नाम जपो, वंड छको समाजासाठी प्रेरणादायी आहे, आणि सर्वांनी या शिकवणुकीनुसार जीवन जगावे, हेच गुरू महाराजांचे खरे आशीर्वाद असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गुरुद्वारा भाई दया सिंगजी समितीच्या सर्व सेवादारांनी अत्यंत प्रेम, निष्ठा आणि समर्पणाने योगदान दिले. याप्रसंगी स्थानिक सामाजिक संस्था, विविध प्रतिनिधी व बाहेरगावाहून आलेल्या भाविकांनी हजेरी लावली होती.

# गुलमोहर रोड येथे ९ नोव्हेंबरला विनामूल्य 'महा आरोग्य शिबीर'




नगर - येथील गुलमोहर रोडला ९ नोव्हेंबर रोजी विनामूल्य महा आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये अस्थिरोग तज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, पोटासंबंधी समस्या, बालरोगतज्ज्ञ, मोफत चष्म्यांसह, नेत्रतज्ज्ञ, रक्त तपासणी करणार आहेत. या शिबिरासाठी आ. संग्राम जगताप यांचे मार्गदर्शन लाभले असून वाबळे मित्रमंडळ, भारतीय माजी सैनिक संघटना, नगर जिल्हा माजी सैनिक संघटना यांचे सहकार्य लाभले आहे अशी माहिती मनसुख वाबळे व सौ.शालिनी वाबळे यांनी दिली आहे

९ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत हे शिबीर आम्रपाली मंगल कार्यालयाजवळ, गुलमोहररोड, पारिजात चौक, सावेडी, नगर येथे होणार आहे. यामध्ये डॉ.राहुल पंडित (एमएस ऑथी.,एम सीएचऑथी) पंडित अपघात रुग्णालय आणि युनिक आयसीयू, डॉ. अतुल खालकर, डॉ.अरविंद अनचवले एम.एस.(जनरल सर्जन) एफ्फ.आय. जी.ई.एस.खालकर हॉस्पिटल, डॉ.अमित करडे स्त्रीरोगतज्ज्ञ आणि लॅपरोस्कोपिक सर्जन, प्रजनन तज्ज्ञ, सुखदा रुग्णालय, डॉ.रामदास बांगर, बालरोगतज्ञ, सिद्धिविनायक रुग्णालय, डॉ.प्रफुल चौधरी स्वस्तिक नेत्रालय आणि मॅटर्निटी हॉस्पिटल हे डॉक्टर उपस्थित राहून तपासणी करणार आहे

याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले असून अधिक माहितीसाठी संपर्क सागर वाबळे-९९२२४ २७६७१, मनसुख वाबळे, माजी सैनिक मो.९८२२४२७६७१, शालिनी वाबळे मो.९९२२४२७६७१ वर संपर्क साधावा.

# तिथ इन - अद्ययावत आणि सुसज्ज दातांचा दवाखाना शुभारंभ





'तिथ इन डेंटल क्लिनिक' या दातांच्या दवाखान्याचा शुभारंभ करताना श्रीमती लीलाबाई शरद रच्चा.

नगर - शहरातील नागरिकांसाठी आधुनिक दंतसेवा देणारा 'तिथ इन डेंटल क्लिनिक' या दातांच्या दवाखान्याचा शुभारंभ श्रीमती लीलाबाई शरद रच्चा यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी डॉ. अनुराधा आराध्ये, डॉ. राजलक्ष्मी रॉय, डॉ. मृणाली रच्चा-खामकर, डॉ. जयेश खंडेलवाल दांपत्य, डॉ. सुरेंद्र रच्चा, डॉ. कांचन रच्चा यांची प्रमुख उपस्थिती होती.

शुभारंभ सोहळ्यात बोलताना डॉ. कुणाल महेश रच्चा यांनी सांगितले की, आपल्या पणजोबांच्या वैद्यकीय सेवाभावी वारशाला पुढे नेत रुग्णसेवेच्या माध्यमातून समाजासाठी काहीतरी देण्याची माझी बांधिलकी आहे. अत्याधुनिक यंत्रसामग्री, स्वच्छ व आरामदायी वातावरण आणि तज्ज्ञ वैद्यकीय सेवा हे या दवाखान्याचे वैशिष्ट्य राहील. अहिल्यानगरच्या मध्यवर्ती भागात म्हणजेच तोफखाना पावन गणपती मंदिराजवळ या दवाखान्याची स्थापना करण्यात आली आहे. 'तिथ इन डेंटल क्लिनिक' हा ग्राउंड फ्लोअरवर असून वाहन पार्किंगची सोय सहज उपलब्ध आहे. नागरिकांना उपचारांसाठी दवाखाना सकाळी ११ ते दुपारी ३ आणि संध्याकाळी ६ ते रात्री १० या वेळेत खुला राहणार आहे.

डॉ. कुणाल रच्चा हे अहिल्यानगर येथील यशवंत चव्हाण डेंटल कॉलेजचे माजी विद्यार्थी असून त्यांनी पुढील वैद्यकीय प्रशिक्षण मुंबई, पुणे आणि नगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली घेतले आहे. गेल्या ३ वर्षांपासून ते दंतउपचार क्षेत्रात कार्यरत आहेत. सध्या ते इंडोडॉन्टिक विषयातील रूट कॅनल ट्रीटमेंट या विशेष शाखेत स्कॉलरशिपसह प्रबंधकार्य करत आहेत, अशी माहिती प्राध्यापक महेश रच्चा यांनी दिली.

या नव्या क्लिनिकच्या स्थापनेबद्दल सौ. रुपाली रच्चा यांनीही समाधान व्यक्त केले असून त्यांनी सांगितले की, रुग्णांचा विश्वास आणि समाधान हीच आमची खरी संपत्ती आहे. रुग्णांना सर्व उपचार एकाच ठिकाणी, आधुनिक तंत्रज्ञानासह आणि अत्यंत वाजवी दरात उपलब्ध करून देण्याचे ध्येय आहे.

या 'तिथ इन डेंटल क्लिनिक' मध्ये दातांच्या सर्व प्रकारच्या आधुनिक उपचारांची सोय आहे. दात दुखी, सूज, वेडे-वाकडे दात सरळ करणे, हिरड्यांवरील आजारांचे उपचार, रूट कॅनल, दात काढणे, पक्के दात बसवणे, कवळी दात पांढरे करणे तसेच स्माईल डिझायनिंग अशा विविध सेवांची सुविधा येथे उपलब्ध आहे.

# युद्ध, पर्यावरण आणि मानवता शाश्वत शांततेची सामाजिक गरज

जगाच्या इतिहासावर नजर टाकली तर मानव सभ्यतेच्या प्रगतीसोबतच युद्धाचा इतिहासही तितकाच प्राचीन आहे. परंतु या संघर्षांनी केवळ राष्ट्रांच्या सीमा बदलल्या नाहीत, तर पृथ्वीच्या पर्यावरणीय संतुलनावरही खोल आणि दीर्घकालीन परिणाम केले आहेत. युद्ध म्हणजे फक्त शस्त्रांचा, सत्तेचा आणि भूभागाचा संघर्ष नव्हे, तर तो मानव आणि निसर्ग यांच्या नात्याचा विध्वंस करणारा एक सामाजिक आणि पर्यावरणीय आपत्तीचा प्रकार आहे. म्हणूनच ६ नोव्हेंबर हा दिवस जगभर 'युद्ध आणि सशस्त्र संघर्षांमध्ये पर्यावरणाच्या शोषणास प्रतिबंध करण्याचा आंतरराष्ट्रीय दिन (International Day for Preventing the Exploitation of the Environment in War and rmed Conflict)' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने २००१ साली हा दिवस घोषित केला, ज्याचा उद्देश युद्धकाळातील आणि त्यानंतरच्या काळातील पर्यावरणीय नुकसानावर जागतिक समाजाचे लक्ष वेधणे हा आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, युद्ध हे केवळ राजकीय घटना नसून मानवी मूल्यांच्या पतनाचे आणि सामाजिक समतोल बिघडण्याचे प्रतीक आहे. समाजाचे आर्थिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय आणि मानवी पैलू हे परस्परांवर अवलंबून असतात. जेव्हा समाज सत्ता, भूभाग आणि संसाधनांवरील ताब्यासाठी युद्धाच्या मार्गावर जातो, तेव्हा या सर्व घटकांमध्ये असलेले नाजूक संतुलन तुटते. युद्धकाळात होणारे पर्यावरणीय नुकसान हे या असंतुलनाचे सर्वात गंभीर आणि दीर्घकालीन रूप आहे. उदाहरणार्थ, दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जर्मनी, जपान आणि इतर देशांमधील औद्योगिक केंद्रे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली; रासायनिक व किरणोत्सर्गी प्रदूषणामुळे माती व पाण्याचे शेकडो वर्षांसाठी नुकसान झाले. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉम्बच्या स्फोटाने लाखो लोकांचे प्राण घेतले, पण त्याचबरोबर पर्यावरणावर निर्माण झालेला किरणोत्सर्ग आजही त्या प्रदेशातील आरोग्य, शेती आणि जैवविविधतेवर परिणाम करतो आहे.

पर्यावरण म्हणजे केवळ जंगल, पाणी, जमीन किंवा प्राणी नाही, तर ते समाजाच्या अस्तित्वाशी आणि विकासाशी निगडित असलेले जीवनाचे अधिष्ठान आहे. जेव्हा युद्धकाळात नैसर्गिक संसाधनांचा वापर शस्त्र म्हणून केला जातो किंवा पर्यावरणाचा नाश केला जातो, तेव्हा समाजाच्या भविष्यातील जीवनाधारालाच धोका निर्माण होतो. १९९१ मधील आखाती युद्धात इराकी सैन्याने कुवैतमधील तेलविहिरींना आग लावली, ज्यामुळे लाखो टन धूर आणि विषारी वायू वातावरणात पसरले. पाण्याचे स्रोत दूषित झाले, जमिनीची सुपीकता कमी झाली, आणि अनेक प्राण्यांचे अधिवास नष्ट झाले. या घटनेने जगाला पुन्हा एकदा दाखवून दिले की युद्ध केवळ मानवी मृत्यूच नव्हे तर पर्यावरणीय विनाशाचाही मार्ग आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार, गेल्या ६० वर्षांतील सुमारे ४० टक्के अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय युद्धे नैसर्गिक संसाधनांच्या ताब्यासाठी झाली आहेत. पाणी, तेल, सोने, हिरा, लाकूड आणि जमीन यांसारख्या संपत्तीवर हक्क मिळवण्यासाठी अनेक राष्ट्रांनी हिंसात्मक मार्ग अवलंबला. या संघर्षांमुळे केवळ मानवाची हानी झाली नाही, तर संपूर्ण परिसंस्थांचे अस्तित्व धोक्यात आले. युद्धकाळात जंगलतोड मोठ्या प्रमाणात केली जाते, खाणींचे अंधाधुंद उत्खनन होते, नद्यांमध्ये रासायनिक द्रव्ये मिसळली जातात, आणि प्रदूषणाचा स्तर अनेक पटींनी वाढतो. अशा प्रकारे, युद्ध पर्यावरणीय असमानतेचे आणि हवामानबदलाचे एक महत्त्वाचे कारण ठरते.

समाजशास्त्रीय नजरेतून पाहिल्यास, युद्धाचा पर्यावरणावर परिणाम हा फक्त भौतिक नाशापुरता मर्यादित नसतो. तो समाजाच्या मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक रचनेवरही खोल परिणाम करतो. जेव्हा एखाद्या प्रदेशाचे पर्यावरण उद्ध्वस्त होते, तेव्हा तेथील लोकांना आपली उपजीविका सोडून स्थलांतर करावे लागते. यामुळे 'पर्यावरणीय निर्वासित' किंवा 'इको–रिफ्युजी' नावाचा नवीन सामाजिक वर्ग निर्माण होतो. या स्थलांतरामुळे इतर भागांमध्ये लोकसंख्येचा ताण वाढतो, अन्नसंकट निर्माण होते, आणि सामाजिक संघर्ष निर्माण होतात. त्यामुळे पर्यावरणाचा नाश हा अखेरीस मानवी समाजाच्या एकात्मतेलाच धक्का देतो.

युद्धकाळातील पर्यावरणीय हानीचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे लिंगाधारित विषमता होय. संघर्षाच्या काळात महिलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. पुरुष युद्धात सहभागी असल्याने घराची जबाबदारी, अन्न–पाण्याची तजवीज आणि मुलांचे संरक्षण यांचा भार महिलांवर येतो. युद्धामुळे पाणी व इंधनाच्या स्रोतांचे नुकसान झाल्याने महिलांना लांब अंतर चालत जावे लागते. यामुळे त्यांच्या आरोग्यावर आणि सुरक्षेवर परिणाम होतो. शिवाय, युद्धकाळातील दारिद्र्य आणि संसाधनांची टंचाई यामुळे महिलांवर अत्याचार, लैंगिक हिंसा आणि जबरदस्तीच्या कामाचे प्रमाण वाढते. त्यामुळे पर्यावरणाचे शोषण आणि महिलांचे शोषण हे युद्धकाळात एकमेकांशी जोडलेले असते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार (UNEP), युद्ध संपल्यानंतरच्या काळात पर्यावरणाचे पुनर्वसन करणे हे शांततेच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. युद्धोत्तर काळात पर्यावरणीय पुनर्बांधणी न केल्यास समाजात पुन्हा संघर्षाचे बीज पेरले जाते. त्यामुळे 'ग्रीन पीस' आणि 'यूएनईपी' सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी युद्धग्रस्त भागांमध्ये पर्यावरणीय स्थिरता निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रम सुरू केले आहेत. हे उपक्रम केवळ पुनर्वसनापुरते नसून शाश्वत विकासाला गती देणारे आहेत.

भारतीय परंपरेत निसर्ग हा देवतासमान मानला गेला आहे. पृथ्वी ही माता आहे आणि आपण तिचे पुत्र आहोत अशी भावना भारतीय संस्कृतीत रूजलेली आहे. महात्मा गांधींनी सांगितले होते की, पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा भागवू शकते, पण कोणाच्याही लोभासाठी नाही. हीच विचारसरणी युद्धोत्तर जगासाठी मार्गदर्शक ठरते. भारताने नेहमीच शांततेचा आणि अहिंसेचा संदेश दिला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये (Sustainable Development Goals) भारताने पर्यावरणीय समतोल, हवामान कृती, आणि सामाजिक न्याय या तीन मूलभूत तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवले आहे.

समाजशास्त्र आपल्याला शिकवते की कोणतीही सामाजिक समस्या ही एकटी नसते; ती विविध घटकांशी गुंफलेली असते. युद्ध आणि पर्यावरणीय संकट हे देखील तसेच परस्परसंबंधित विषय आहेत. युद्ध हा केवळ राजकीय प्रश्न नाही, तर तो सामाजिक असमानता, आर्थिक विषमता, आणि सांस्कृतिक अविश्वास यांचे मूळ आहे. जेव्हा समाजात शाश्वत विकास, सामाजिक न्याय, आणि पर्यावरणीय समता या मूल्यांचा अभाव असतो, तेव्हा युद्ध अपरिहार्य बनते. म्हणूनच युद्ध रोखण्यासाठी पर्यावरणसंवर्धन आणि सामाजिक समता या दोन्ही गोष्टींना समान प्राधान्य देणे आवश्यक आहे.

आजच्या घडीला हवामानबदल, पाण्याची टंचाई, प्रदूषण आणि संसाधनांची टंचाई या जागतिक समस्या आहेत. जर या समस्यांकडे दुर्लक्ष झाले, तर भविष्यकाळात युद्धाचे नवे कारण ही पर्यावरणीय असमानता असेल. म्हणूनच ६ नोव्हेंबरचा हा दिवस आपल्याला फक्त भूतकाळातील चुकांची जाणीव करून देत नाही, तर भविष्यातील धोकेही दाखवतो. युद्धकाळातील पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे मानवतेचे रक्षण करणे होय.

शांतता आणि पर्यावरण हे एकमेकांचे पर्याय नाहीत, तर परस्पर पूरक आहेत. जेव्हा समाज पर्यावरणाशी सुसंवाद साधतो, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने शांततेच्या दिशेने वाटचाल करतो. म्हणूनच आजच्या पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे हिरवी शांतता संस्कृती निर्माण करणे – अशी संस्कृती जी पर्यावरण, मानवता आणि समाज यांना समान महत्त्व देईल. शिक्षण, माध्यमे, समाजसंस्था आणि शासन यांच्या समन्वयातून पर्यावरणपूरक जीवनशैली, पुनर्निर्मित उर्जा, आणि संसाधनांचे शाश्वत वापर यांची सवय लावणे ही काळाची गरज आहे. शेवटी, युद्ध आणि पर्यावरण यांच्यातील नाते समजून घेणे म्हणजेच मानवतेच्या भविष्यासाठी जबाबदारी स्वीकारणे होय. युद्ध जिंकणारे राष्ट्र कधीही खरे विजेते नसते; खरे विजेते तेच जे आपल्या भूमीचे, आपल्या समाजाचे आणि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करतात. म्हणूनच हा ६ नोव्हेंबरचा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की 'शांती म्हणजे फक्त युद्धाचा अभाव नाही, तर पर्यावरणीय संतुलनाचा सन्मान आहे.'



'पृथ्वी आपली मालकी नाही, आपण तिचे पालक आहोत, तिचे रक्षण करणे हीच खरी देशभक्ती आहे.'

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# महाराष्ट्रामधील सर्वाधिक विक्रीबद्दल नगरमधील दर्शन सेल्सला श्री सिमेंटचा बाहुबली अवार्ड प्रदान

नगर – श्री सिमेंट लिमिटेड कडून महाराष्ट्रात श्री सिमेंट हाईस प्रिमिअम प्राडेकर सर्वाधिक विक्री केल्याबद्दल नगरमधील मे. दर्शन सेल्स कॉर्पोरेन्शनला बाहुबली अवार्ड ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. गोवा येथे झालेल्या कार्यक्रमात राहुल सुभाषचंद्र सोनीमंडलेचा (माकेकर) यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी कंपनीचे प्रेसिडेंट प्रशांत बांगर (कोलकता), एम.डी. शैलेश अंम्बस्ता (दिल्ली), व्हाईस एम.डी. निरज बाजवा (मुंबई), महाराष्ट्र हेड अवतार सिंग बोहल, नितीन पालीवाल, किरजी जैस्वाल, कनक देशपांडे, आशिष ठाकुर आदी उपस्थित होते.





महाराष्ट्रातील सर्वाधिक विक्री बद्दल नगरमधील मे. दर्शन सेल्सला श्री सिमेंटचा बाहुबली अवार्ड प्रदान करण्यात आला.

राहुल सोनीमंडलेचा यांनी सांगितले की, श्री सिमेंट ही कंपनी ४७ वर्ष जुनी असून महाराष्ट्र मध्ये ७ वर्षापासून व्यवसाय करत आहे. श्री दर्शन सेल्स ७ वर्षापासून कंपनीचे डिस्ट्रीब्यूटर असून श्री सिमेंट कंपनीने सर्वाधिक सेल केल्याबद्दल दर्शन सेल्स यांना सेल्स प्रमोटर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. नुकतीच दक्षिण आफ्रिका येथे सहपरिवार अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली होती. सर्वाधिक विक्री करण्याचा बहुमान आणि बाहुबली पुरस्कार दर्शन सेल्ससाठी अभिमानास्पद आहे.

या यशात मोठे योगदान बिल्डर्स, कॉन्ट्रॅक्टर, मित्र परिवार, हितचिंतक, नातेवाईकांचे आहे. त्याचे पाठबळ असल्यानेच ही भरारी घेता आली. यांचे आभार व्यक्त करतो. भविष्यातही अशीच कामगिरी करण्याचा प्रयत्न राहील असा विश्वास राहुल सोनीमंडलेचा यांनी व्यक्त केला.

# सहकारमहर्षि सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेची प्रगतीची घोडदौड पाहून सुखावलो : शांतीलाल गांधी

नगर – शहरातील कापडबाजार लगत असलेल्या सहकारमहर्षि सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या प्रगतीची २५ वर्षामधील घोडदौड पाहून सुखावलो, असे कौतुकोद्‌गार पतसंस्थेचे संस्थापक सभासद शांतीलाल गांधी यांनी काढले. ज्येष्ठ संचालक शांतीलाल गुगळे आणि माजी चेअरमन व विद्यमान संचालक संतोष गांधी यांनी त्यांचे स्वागत केले.



शांतीलाल गांधी यांनी सहकारमहर्षि सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेस भेट दिली असता त्यांचे स्वागत करताना माजी चेअरमन व विद्यमान संचालक संतोष गांधी यांनी त्यांचे स्वागत केले.

सहकारमहर्षि सुवालालजी गुंदेचा यांच्या खांद्याला खांदा लावून कार्य केलेल्या आणि पतसंस्थेच्या स्थापनेप्रसंगी सोनगाव सात्रळसह आश्वी परिसरातील सभासद मिळवण्यासाठी अथक परिश्रम घेतलेल्या शांतीलाल गांधी यांनी पतसंस्थेस सदिच्छा भेट दिली. पतसंस्थेचे सुरळितपणे चाललेले कामकाज पाहून सुवालाल गुंदेचा यांचे स्वप्न साकारले. त्यांना अपेक्षित असलेलेच कार्य या पतसंस्थेच्या माध्यमातून सुरू आहे, असे सांगताना ते गहिवरून गेले. पतसंस्थेची स्व–मालकीची नवीन प्रशस्त वास्तू, सुवालालजींचा फोटो आणि पतसंस्थेचे चाललेले कामकाज पाहून भारावून गेलो, असे म्हणताना त्यांनी सुवालालजींच्या सहवासामधील स्मृतींना ऊजाळा दिला.

यावेळी पतसंस्थेचे संचालक संतोष गांधी म्हणाले, शांतीलाल गांधी हे प्रगती पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन असून गेली ३८ वर्षे सोनगाव व्यापारी असोसिएशनचा कार्यभार सांभाळत आहेत. या असोसिएशनचे अध्यक्षपदही त्यांनी समर्थपणे सांभाळले आहे.

ज्येष्ठ संचालक शांतीलाल गुगळे यांच्या हस्ते शांतीलाल गांधी यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी पतसंस्थेचा कर्मचारी वृंद उपस्थित होता.

# श्रद्धा आणि सेवा या आधारस्तंभांवर साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे कार्य प्रेरणादायी

## मनपा आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन

नगर – वसंत टेकडी येथील संदेशनगर मधील साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने दर महिन्याच्या अखेरच्या गुरुवारी आयोजित करण्यात येणारी 'साईनाथ भजन संध्या' श्रद्धा आणि उत्साहात झाली. या कार्यक्रमात भाविकांनी साईनामाचा अखंड जयघोष केली. कार्यक्रमाचा समारोप महाआरतीने करण्यात आला. ही महाआरती अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते पार पडली. यावेळी नगरसेवक सुनील नारायण त्र्यंबके, बाळासाहेब पवार, शंतनु वाने, विकी करोलिया, शहाणे काका, संदीप कोरोलिया, आणि निखिल त्र्यंबके यांच्या सह अनेक उपस्थित होते.



साई मंदिरात मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते आरती करण्यात आली प्रतिष्ठानतर्फे माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके यांनी त्यांचा सन्मान केला. या प्रसंगी बाळासाहेब पवार प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते. (छाया – विजय मते)

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानने समाजात धार्मिकतेबरोबरच सामाजिक कार्याचा सुंदर संगम साधला आहे. श्रद्धा आणि सेवा या दोन आधारस्तंभांवर उभी राहिलेली ही संस्था अहिल्यानगरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी आहे. विशेष म्हणजे सुनील त्र्यंबके यांनी साई सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून नागरिकांना मदतीचा हात देत, धार्मिक आणि सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे समाजात एकात्मतेचा आणि सद्भावनेचा संदेश पसरत आहे. तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले की, महानगरपालिकेच्या माध्यमातून आम्ही अशा समाजोपयोगी संस्थांना नेहमीच सहकार्य करू. साईनाथांच्या कृपेने शहरात सकारात्मकता, भक्ती आणि सेवाभाव वाढावा, हीच आपली अपेक्षा आहे.

कार्यक्रमात नगरसेवक सुनील त्र्यंबके यांनी सुद्धा आपले विचार मांडले. ते म्हणाले, साईनाथ भजन संध्या हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, तो समाजातील ऐक्य आणि भक्तीचा उत्सव आहे. साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून आम्ही नेहमीच दुर्बल घटकांना सहाय्य करण्याचा आणि समाजात चांगुलपणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला आहे. नागरिकांनी साईनाथांच्या उपदेशाप्रमाणे 'श्रद्धा आणि सबुरी' या दोन मूल्यांचा अंगीकार करून समाजकार्यात सहभागी व्हावे, हीच आमची अपेक्षा आहे.

या कार्यक्रमात भक्तांना प्रसाद वितरण करण्यात आले.

# 'परीसवेध' पुस्तकाचे ७ नोहेंबरला वितरण

नगर – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीचे औचित्य साधून




अहिल्यानगरचे स्वयंसेवक व लेखक राजाभाऊ मुळे यांनी लिहिलेल्या परीसवेध या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे नुकतेच प्रकाशन झाले आहे. या पुस्तकाच्या सुमारे ३०० प्रति मी खरेदी केल्या असून त्याचे समाजातील विविध क्षेत्रातील मंडळींना मोफत वितरीत करण्याचा संकल्प केला आहे. हा कार्यक्रम ७ नोहेंबर रोजी सकाळी ११ वाजता बेलापूर येथील महानुभाव मठामध्ये होणार आहे. यावेळी मठाचे प्रमुख आनेराजबाबा शास्त्री, संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांतसंघचालक नानासाहेब जाधव तसेच लेखक रवींद्र मुळे उपस्थित राहणार आहे, अशी माहिती निमंत्रक बेलापूर येथील स्वयंसेवक विलास शिंदे यांनी दिली.

# आत्मसुधार करत जगात शांतिसुखाचे वातावरण तयार करा : निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज

नगर – संत निरंकारी मिशनचा ४ दिवसीय ७८वा वार्षिक निरंकारी संत समागम सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन छत्रछायेखाली संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे आध्यात्मिकतेच्या मंगलमय वातावरणात नुकताच झाला. ६५० एकरांच्या विशाल मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या संत समागमामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून तसेच देश–विदेशातून लाखोंच्या संख्येने भाविक भक्तगणांनी सहभागी होऊन भक्तीमय वातावरणाचा आनंद प्राप्त केला. या मध्ये नगर शहर, जिल्हा तसेच झोन ३६अ अंतर्गत येणाऱ्या ५ जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावली व राज्यातील हजारो सेवादल बंधू भगिनींनी समागमाच्या विविध सेवांमध्ये योगदान दिले. या संत समागमाचा मुख्य विषय होता 'आत्ममंथन'.



संत निरंकारी मिशनचा वार्षिक निरंकारी संत समागम सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन छत्रछायेखाली संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे आध्यात्मिकतेच्या मंगलमय वातावरणात नुकताच झाला. ६५० एकरांच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या संत समागमामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून तसेच देश–विदेशातून लाखोंच्या संख्येने भाविक भक्तगणांनी सहभागी होऊन भक्तीमय वातावरणाचा आनंद प्राप्त केला.

## ७८ वा वार्षिक निरंकारी संत समागम, नगरसह महाराष्ट्रातील लाखो भाविक सहभागी

**मानवतेच्या नावे संदेश :** समागमाचा शुभारंभ सत्गुरु माताजींनी मानवतेच्या प्रति दिलेल्या दिव्य संदेशाने झाली. त्यामध्ये माताजींनी सांगितले, की मानवाने मानवतेचा मार्ग स्वीकारावा, स्वतःचे अंतरंग सदोदित शुद्ध करत जावे जेणेकरून त्याची व्याप्ती वाढत जाऊन संपूर्ण बाह्य जगात सुधारणा घडेल आणि सगळीकडे शांतीसुखाचे वातावरण स्थापित होईल. सत्गुरु माताजी म्हणाल्या, की आत्ममंथन ही अंतरंगातील एक यात्रा आहे. यास केवळ विचार, मन आणि बुद्धीच्या स्तरावर जाणले जाऊ शकत नाही. यासाठी आपल्या अंतरंगात आध्यात्मिक स्वरूपात चिंतन करण्याची गरज आहे. प्रत्येक मानवाच्या अंतःकरणात आणि बाह्य जगात एक सत्य निवास करते जे स्थिर आणि शाश्वत आहे. हे सत्य प्रथम जाणले पाहिजे. जेव्हा मानवाला प्रत्येकाच्या अंतरंगातील या सत्याचे दर्शन होईल, तेव्हा त्याचा मनात प्रत्येका विषयी प्रेमभाव उत्पन्न होईल.

तत्पूर्वी, समागम स्थळी आगमन होताच समागमात उपस्थित समस्त मानव परिवाराच्या वतीने सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांचे स्वागत संत निरंकारी मंडळाच्या कार्यकारिणीतील वरिष्ठ सदस्यांकडून पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. त्यानंतर या दिव्य जोडीला फुलांच्या सजावटीने सुशोभित खुल्या पालखीमध्ये विराजमान करून समागम पंडालच्या मध्यभागातून मुख्य मंचापर्यंत एका शोभायात्रेच्या रूपात नेण्यात आले. मुख्य मंचाजवळ पोहोचताच, संत निरंकारी इन्स्टिट्यूट ऑफ म्युझिक ॲण्ड आर्ट्सच्या २५०० हून अधिक विद्यार्थ्यांकडून भरत नाट्यम नृत्याद्वारे स्वागत गीताचे गायन करण्यात आले. ते दृश्य अत्यंत विलोभनीय होते.

**सेवादल रॅली :** समागमाच्या दुसऱ्या दिवसाचा शुभारंभ सेवादल रॅलीने झाला. या रॅलीमध्ये संपूर्ण भारतातून तसेच परदेशातून आलेल्या सेवादलातील बंधु–भगिनींनी सहभाग घेतला. यात शारीरिक कवायती, खेळ आणि मिशनच्या शिकवणींवर आधारित लघुनाटिका सादर केल्या गेल्या. या प्रसंगी आशीर्वाद प्रदान करताना सतगुरु माताजी म्हणाल्या, की एक भक्त हा चोवीस तास सेवादारच असतो; तथापि, जेव्हा वर्दी परिधान करून सेवा केली जाते, तेव्हा त्याची जबाबदारी अनेक पटींनी वाढते. जेव्हा सेवा या भावनेने समर्पणपूर्वक केली जाते, तेव्हा हे योगदान खरोखरच मानवतेच्या कल्याणासाठी होत राहते.

समागमाच्या दुसऱ्या दिवशी सायंकाळी उपस्थित विशाल मानव परिवाराला आपले आशीर्वाद प्रदान करताना सत्गुरु माताजी म्हणाल्या, की आत्ममंथन ही केवळ साधी विचार करण्याची प्रक्रिया नसून, स्वतःच्या अंतर्मनात डोकावण्याची एक साधना आहे, जी परमात्म्याच्या अनुभूतीमुळे सहज सुलभ होऊ शकते. आत्ममंथन म्हणजे स्वतःच्या सुधारणेचा मार्ग आहे असे शेवटी सांगितले.

समागमाच्या तिसऱ्या दिवशी संबोधित करताना सत्गुरु माताजी म्हणाल्या, की केवळ भौतिक संसारामध्ये रमणे किंवा आध्यात्मिक उन्नतीच्या नावाखाली संसाराचा त्याग करणे या दोन्ही बाबी अत्यंत टोकाच्या आहेत. संतांनी सदोदित मध्यम मार्गाचा उपदेश केला आहे. संसारात राहून जबाबदाऱ्यांचे पालन करत असतानाच परमार्थ साधून संतुलीत जीवन जगण्याचा संदेश संतांनी दिला आहे. जेव्हा आपण परमात्म्याच्या उपस्थितीची जाणीव ठेवून प्रत्येक कार्य निर्लेप भावनेने करतो तेव्हा ती एक प्रकारची सेवाच होते आणि त्यायोगे जीवनाच्या दोन्ही पैलुंची पूर्ती होऊ शकते.

निरंकारी राजपिता रमितजींनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, की परमात्म्याबद्दल अनेक भिन्न भिन्न दृष्टिकोन पाहायला व ऐकायला मिळतात. वास्तविक परमात्मा हे एक असे सार्वभौमिक सत्य आहे जे सदैवकाळ सत्य राहते. वेद, ग्रंथ, शास्त्रे याचेच प्रमाण देतात. हे सत्य जाणण्याचा अधिकार प्रत्येक मानवाला आहे आणि या परम सत्याचा बोध करून देण्यासाठीच सतगुरु पृथ्वीवर अवतरित होतात. म्हणूनच प्रत्येक मानवाने सतगुरुंच्या कृपेने वेळ असतानाच हे सत्य प्राप्त करावे.

समागमात हरियाणाचे राज्यपाल प्रो. असीमकुमार घोष, मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांनी येऊन सतगुरु माताजी व निरंकारी राजपिताजी यांचे आशीर्वाद प्राप्त केले व त्यांच्या प्रति आपला आदरभाव व्यक्त केला.

**समापन सत्र :** या वर्षीचा संत समागम हा चार दिवसांचा होता समापन प्रसंगी सत्गुरु माताजींनी सांगितले, की ईश्वराने हे जग अत्यंत सुंदर बनविले आहे आणि मानवाने त्याचा आनंद अवश्य घ्यायचा आहे. तथापि, आपल्या विवेक बुद्धीचा वापर करुन प्रभुनिर्मित सृष्टीतील समस्त वस्तूंचा सदुपयोग करावा, दुरुपयोग करु नये. शेवटी, सत्गुरु माताजींनी निरंकारी भक्तगणांना आवाहन केले, की चार दिवसाच्या या संत समागमामध्ये जे आत्ममंथन झाले आहे, जी दिव्य शिकवण प्राप्त झाली आहे ती रात्रंदिवस, जीवनभर आपल्या जीवनात उतरवून स्वतःचे कल्याण साधण्याबरोबरच इतरांचेही कल्याण करत जावे.

**कवि दरबार :** या संत समागमामध्ये प्रत्येक दिवशी कवि दरबार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ज्यामध्ये विद्वान बालक, महिला व पुरुष मिळून एकंदर ३८ कवींनी हिंदी, पंजाबी, इंग्रजी, हरियाणवी, मुलतानी, उर्दु आणि मराठी भाषांमधून 'आत्ममंथन' या विषयावर आपापल्या कविता सादर केल्या.

**निरंकारी प्रदर्शनी :** संत समागमामध्ये आधुनिक तंत्रज्ञान व विद्युत रोषणाईचा वापर करुन अत्यंत सुंदर प्रदर्शनी तयार करण्यात आली होती, जी भाविक–भक्तगणांच्या आकर्षणाचे केंद्र बनून राहिली. भाविकांच्या सुविधेसाठी ही प्रदर्शनी मुख्य प्रदर्शनी, बाल प्रदर्शनी वं संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशनची प्रदर्शनी अशा तीन भागांमध्ये विभाजित करण्यात आली होती जिचा लाभ लाखो भाविकांनी प्राप्त केला.

# ‘स्व. प्रमोद महाजन स्पर्धा परीक्षा केंद्र’ मनपाची कोटींची मालमत्ता कवडीमोल भावात रु.१५०० भाडे तत्वावर देण्याचा प्रशासकांचा घाट

## निर्णय मागे घेतला नाही, तर विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना सोबत घेऊन आम्ही रस्त्यावर उतरू, आयुक्त डांगे यांनी पालिकेचे दिवाळे काढण्याचा संकल्प केलाय का ? : दीप चव्हाण

नगर – गेल्या ७ वर्षांपासून बंद असलेले अहिल्यानगर महानगरपालिकेचे सावेडी येथील स्व. प्रमोद महाजन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र मनपाची सुमारे २५ कोटी रुपयांची मोक्याच्या जागेवरील व्यावसायिक मालमत्ता कवडीमोल भावात अवघ्या १५०० रुपये भाडेतत्वावर देण्याचा घाट प्रशासक अहिल्यानगर महानगरपालिका यशवंत डांगे यांनी घातला आहे. पालिकेच्या तिजोरीत खडखडाट असतांना ज्या मिळकतींद्वारे पालिकेला दरमहा मोठे उत्पन्न मिळू शकते त्या मालमत्ता अशा प्रकारे चुकीच्या संस्थांच्या ताब्यात देऊन आयुक्त डांगे यांनी पालिकेचे दिवाळे काढण्याचा संकल्प केला आहे का ? असा सवाल काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी विचारला आहे. हा ठराव रद्द करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री, सचिव, नगर विकास मंत्रालय, जिल्हाधिकारी अहिल्यानगर आणि आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांच्याकडे निवदेन देऊन केली आहे.

सावेडीतील स्व. प्रमोद महाजन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र या ठिकाणी अहिल्यानगर मधील गुणवंत, प्रतिभावान पण गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना विनामूल्य दर्जेदार प्रशिक्षण देऊन त्यांना MPSC, UPSC, PSI, LIC इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी तयार करण्याचा हेतू होता. यातून नगरमधील गुणी होतकरू मुले स्पर्धा परीक्षा मध्ये यशस्वी होऊन उच्च पदावर जातील असे अपेक्षित होते. मात्र, आज तेच केंद्र नाममात्र ₹१५०० मासिक भाड्यावर एका साहित्यिक संस्थेला देण्याचा निर्णय घेतल्याने प्रशासनावर संतापाची लाट उसळली आहे. यशवंत डांगे यांनी कोणाच्या दबावाखाली हे सोन्यासारखे स्पर्धा परीक्षा केंद्र किरकोळ रकमेत भाड्याने देण्याचा निर्णय अवघ्या एका महिन्यात सर्व प्रक्रिया पूर्ण करून घेतला ? असा सवाल दीप चव्हाण यांनी विचारला आहे.

हा बेकायदेशीर ठराव महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५१ अंतर्गत रद्द करण्यासाठी शासनाकडे पाठवावा व अधिकृत निविदा काढून हे केंद्र योग्य सक्षम संस्थेस चालविण्यास देण्याची प्रक्रिया पुन्हा राबवावी, त्यासाठी या टेंडरची वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करावी. पात्र सक्षम संस्थांशी संपर्क करून प्रस्ताव मागवावेत अशी मागणी दीप चव्हाण यांनी केली आहे.

आयुक्त डांगे यांनी प्रशासक या नात्याने गेली तीन वर्ष आपल्या मनमानी पद्धतीने कारभार चालवला आहे. ज्या पद्धतीने पालिकेतील स्थायी आणि सर्वसाधारण सभेत विषय घेतात कायद्यानुसार तो अजेंडा स्थानीक लोकप्रतिनिधी, विद्यमान खासदार, दोन्ही आमदार विधानसभा व विधानपरिषद यांना पाठवणे बंधनकारक असतांना फक्त एका स्थानिक आमदाराचा सल्ला आणि आदेशाने बेकायदेशीर निर्णय घेतले जातात. सदर केंद्रासाठी अर्ज केलेली संस्था शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य ही संस्था गेली सोळा वर्षे मराठी भाषा, साहित्य आणि काव्य क्षेत्रात कार्यरत आहे, असे त्यांनी स्वतः त्यांच्या अर्जात नमूद केले आहे. शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य या संस्थेकडून प्रमोद महाजन स्पर्धा परीक्षा केंद्र नाममात्र भाडेतत्वावर देण्याची मागणी करण्यात आली. आणि प्रसिद्धी विभागाचे अधिकारी शशिकांत नजान यांच्या सहीने किरकोळ अटी व सेवा शर्ती टाकून हा प्रस्ताव उपायुक्तांपुढे ठेवण्यात आला.



मागील वर्षी ९ डिसेंबर २०२४ रोजी हा प्रस्ताव तयार झाला. त्यावर उपायुक्त कर यांनी नगर सचिव यांनी या केंद्राची इमारत अल्प दरात संबंधित संस्थेला देण्याबाबत स्पष्ट अहवाल मागवला. अर्थात, या अहवालात केंद्राचा मूळ उद्देश, बाजारभाव, कायदेशीर पात्रता वा पारदर्शक निविदा प्रक्रिया यांचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे हा प्रस्ताव सार्वजनिक संपत्तीचा वापर दबावाखाली खासगी संस्थेसाठी करण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा जनतेत सुरू आहे. नगर सचिवांनी असा कोणताच अहवाल दिला नाही. तरी देखील ३० डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या स्थायी आणि सर्वसाधारण सभेत आयुक्त यशवंत डांगे यांनी उपायुक्त कर याचे नाव खोडून स्वतः शब्दगंध संस्थेला हे केंद्र अवघ्या १५०० रुपयात भाड्याने देण्यात यावे. असा प्रस्ताव समोर मंजुरीसाठी ठेवा असा शेरा मारला. आणि करार करून केंद्र चालविण्यास देणे फक्त बाकी ठेवले.

२५ कोटी रुपयांची मालमता अवघ्या २५ हजार रुपयांच्या अनामत रकमेत आणि वर्षाकाठी अवघ्या १८००० रुपये दराने भाडेतत्वावर देण्यात येते आहे. सदर केंद्र २०१६ साली विद्यार्थ्यांसाठी सुरु करण्यात आले होते. तेथून अनेक विद्यार्थी एमपीएससी, यूपीएससी, बँकिंग, रेल्वे अशा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झाले होते. कोविडनंतर हे केंद्र बंद झाले असले तरी आजही अशा मार्गदर्शनाची गरज आहे. म्हणून नागरिक आणि विद्यार्थी संघटनांनी प्रमोद महाजन स्पर्धा परीक्षा केंद्र पुन्हा विद्यार्थ्यांसाठीच सुरु करावे, अशी मागणी करत प्रशासकांच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी केली होती.

त्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी आणि मनपाचे प्रभारी आयुक्त राहुल द्विवेदी यांच्या कार्यकाळात एक टेंडर प्रक्रिया राबविण्यात आली. त्यात नामांकित संस्थांनी भाग घेतला. अहमदनगर जिल्हा वाचनालय, नगरमधील संदीप कुसळकर यांची युवान संस्था, राजमुद्रा करियर ॲकेडेमी तसेच नरेंद्र फिरोदिया यांचे शांतीकुमार फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन यांनी यासाठी प्रस्ताव दिला होता. यापैकी वर्षाकाठी २ ते ३ लाख रुपये भाडे देण्याचे काही संस्थांनी मान्य केले होते. मात्र राहुल द्विवेदी जाताच हा प्रस्ताव भिजत पडला. या केंद्राला शासनाचा भरीव असा निधी या अगोदर प्राप्त झाला होता. पालकमंत्री बबनराव पाचपुते यांनी अंदाजे दीड कोटींचा निधी दिला होता. यातून हे अद्ययावत संकुल उभे राहिले. आणि आता २९ मार्च २०२३ मध्ये महापालिका क्षेत्रातील सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेन्तर्गत ५५ लाख रुपये विधानपरिषदेचे आमदार सत्यजित तांबे यांनी यासाठी उपलब्ध करून दिले. आता तर कोणतीही प्रक्रिया न राबविता हे लाख मोलाचे केंद्र एका शब्दगंध संस्थेच्या साध्या अर्जावर किरकोळ रकमेत तीन वर्षांसाठी चालविण्यास देण्यात येते आहे. ज्या संस्थेचा जन्मच मराठी कविता, वाङ्मय आणि साहित्यिक कार्यक्रमांसाठी झाला. ती संस्था अचानक प्रशासकीय स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देणार म्हणतेय? ज्या संस्थेला फक्त कथा कविता करण्याचा अनुभव आहे. ती संस्था स्पर्धा परीक्षा मधील अवघड गणिते, बौद्धिक कसोट्या, कूटनीतीचे प्रश्न सोडविण्याचे प्रशिक्षण देऊ शकेल काय ?

महाराष्ट्र महानगरपालिका भाडे अधिनियम, १९२३ कायद्यानुसार, कोणतीही महानगरपालिका सार्वजनिक हेतूसाठी उभारलेली इमारत खासगी भाड्याने देऊ शकत नाही, जोपर्यंत त्या जागेचा हेतू शासनमान्य बदलण्यात आलेला नसतो. तसेच भाडे दर ठरविताना बाजारभाव, सार्वजनिक उपयोग आणि पारदर्शक प्रक्रिया बंधनकारक आहेत. ₹१५०० मासिक भाडे म्हणजे सार्वजनिक संपत्तीचे लिलावमूल्य ठरवले आहे का ?

प्रोफेसर कॉलनीसारख्या प्राईम लोकेशनमधील, साऊंड प्रूफ (ध्वनीरोधक) आणि वातानुकूलित आधुनिक इमारतीचे हे भाडे कितपत योग्य आहे. १०० विद्यार्थी या ठिकाणी प्रशिक्षण घेणार आहेत. मग या जागेची किंमत प्रति विद्यार्थी १५० रुपये प्रतिमाह झाली आहे का ? मनमानी पद्धतीने महानगरपालिकेच्या प्रशासकांनी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीत लोकशाहीला डावलत घेतलेले हे एकतर्फी निर्णय असल्याची टीका होत आहे. शब्दगंध साहित्यिक परिषद या संस्थेचा नोंदणीकृत उद्देश साहित्य संवर्धन असून, ती ना शिक्षण प्रशिक्षण संस्था आहे, ना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन देण्यास पात्र. अशा संस्थेला स्पर्धा परीक्षा केंद्र चालविण्याची परवानगी देणे म्हणजे पात्रतेचा आणि पारदर्शकतेचा भंग ठरतो.

सदर इमारत स्व. प्रमोद महाजन यांच्या नावाने असून ही जागा प्राईम लोकेशन म्हणून ओळखली जाते. त्यामुळे प्रमोद महाजन यांच्या नावाचा वापर करून विद्यार्थ्यांचा हक्क विकणे हा त्यांच्या विचारांचा अपमान नाही का ? यावरून ही इमारत विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आहे का राजकीय सौद्यासाठी? असा मोठा प्रश्नच उपस्थित झाला आहे. त्यामुळे हा निर्णय मागे घेतला नाही, तर विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना सोबत घेऊन आम्ही रस्त्यावर उतरू. स्पर्धा परीक्षा केंद्र विद्यार्थ्यांसाठीच राहिले पाहिजे, कोणत्याही संस्थेच्या भाड्याच्या गणितासाठी नव्हे. त्यामुळे हा प्रस्ताव तात्काळ रद्द करावा, अशी मागणी दीप चव्हाण यांनी या निवेदनात केली आहे.

# नगरच्या माऊली सभागृहात ९ नोव्हेंबर रोजी ‘विठ्ठल हवा विठ्ठल नवी’ गीतरंगाचा कार्यक्रम

नगर – स्वरप्रभा फाउंडेशनने नगर–मनमाड रोडवरील माऊली सभागृहात ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० ते ११.३० वाजेपर्यंत विठ्ठल हवा विठ्ठल नवा हा गीतरंगाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम पराग पांडव व आदिती गराडे सादर करतील. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य आहे.

या कार्यक्रमास भास्करगिरीमहाराज प्रमुख म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमासाठी महेंद्र गंधे, गौतम मुनोत, संजीवनी बागडे, इंदुमती पारख, राजेंद्र शुक्रे, लोकेश मेहतानी, डॉ. प्रकाश गरुड आदींचे सहकार्य लाभले आहे.

गीतलेखन, संगीत व गायन पराग पांडव, तसेच गायन आदिती गराडे करतील. त्यांना संवादिनीवर आदिती गराडे, कीबोर्ड वैभव फणसळकर, तबला प्रशांत थोरात, पखवाज, ढोलक पवन अवचरे, तालवाद्य नरेंद्र काळे, बालगीत गायन सर्विन पांडव, ध्वनि राजू ढोरे आदी साथसंगत करणार आहेत. अधिक माहितीसाठी स्वाती गराडे, मो. ८३७९०८८०७५, दत्तात्रय गराडे ८६०५८६४४४२, संजीव बागडे ८२३७८८६४३३ यांच्याशी संपर्क साधावा.

# मराठी साहित्य मंडळातर्फे पै. नाना डोंगरे यांना समाजभूषण पुरस्कार जाहीर



नगर – कविवर्य नारायण सुर्वे जन्मशताब्दी निमित्त, मराठी साहित्य मंडळ (ठाणे) यांच्या वतीने येथील पै. नाना डोंगरे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अहिल्यानगर मध्ये ९ नोव्हेंबर रोजी साहित्य मंडळाच्या वतीने आयोजित सोळाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात डोंगरे यांना सदर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

स्व. शाहूराव देशमुख साहित्य नगरीत संमेलनाचे उद्घाटक आमदार संग्राम जगताप, संमेलन अध्यक्ष तथा जेष्ठ कादंबरीकार दशरथ यादव, संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर, स्वागत अध्यक्ष जयद्रथ खाकाळ व इतरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष त्र्यंबकराव (बाळासाहेब) देशमुख यांनी दिली.

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पै. नाना डोंगरे नगर तालुक्यासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध क्षेत्रात कार्य करत आहे. संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरु आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध कार्यक्रम घेऊन संस्थेने पर्यावरण संवर्धनासाठी मोठी जनजागृती केली आहे. स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जागृती, जलसंधारण जागृती मोहिम व रक्तदान शिबीर व्यापक स्वरुपात राबविण्याचे कार्य सुरु आहे.

तसेच युवकांसाठी व्यसनमुक्तीवर विविध उपक्रम घेऊन जनजागृती केली जात आहे. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून गावपातळीवर ग्रामस्थांना आधार देण्याचे कार्य सुरु आहे. विविध स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, युवा संमेलन घेऊन समाजाला दिशा देण्याचे कार्य संस्थेच्या माध्यमातून सुरु आहे. साहित्य चळवळीला चालना देण्यासाठी त्यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलन आणि तीन ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे त्यांनी आयोजन केले होते. या कार्याची दखल घेऊन त्यांना मराठी साहित्य मंडळ (ठाणे) यांच्या वतीने राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर केला आहे.

## सीए फायनल परीक्षेत मोहम्मद रझा सलीम शेख उत्तीर्ण



नगर – दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया (नवी दिल्ली) यांच्यावतीने सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत हातमपुरा भागात राहणारा मोहम्मद रझा सलीम शेख उत्तीर्ण झाला. एन जे लोहे ॲण्ड कंपनी यांच्याकडे मोहम्मद रझा शेख यांनी आर्टिकलशिप पूर्ण केली आहे. त्यांना सीए पवनकुमार दरक आणि सीए पुनीत वोहरा यांचे मार्गदर्शन लाभले.

मोहम्मद रझा व्हिजन प्लस फाउंडेशन संचलित व्हिजन स्टडी सेंटर चा विद्यार्थी आहे. त्याच्या या यशाबद्दल व्हिजन प्लस फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नदीम सय्यद, सचिव परवेज शेख, माजी समाज कल्याण अधिकारी रफिक मुंशी यांनी अभिनंदन केले आहे.

## सीए फायनल परीक्षेत मानसी बेंद्रे उत्तीर्ण



नगर – दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया (नवी दिल्ली) यांच्यावतीने सप्टेंबरमध्ये घेण्यात आलेल्या सीए अंतिम परीक्षेत मानसी बेंद्रे ही उत्तीर्ण झाली आहे.

मानसी ही भिंगार येथील श्री इलेक्ट्रिकल्सचे संचालक दिवंगत अलिप्त किसनराव बेंद्रे यांची धाकटी कन्या आहे. या यशासाठी तिला वरीष्ठांचे आणि तिच्या आई अनुराधा बेंद्रे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. या यशाबद्दल तिचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

# केडगावमध्ये ९ नोव्हेंबरला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

## राज्यभरातील साहित्यिकांची राहणार उपस्थिती; ‘पावसाची कथा आणि शेतकऱ्यांची व्यथा’ या विषयावर होणार परिसंवाद

नगर – केडगाव येथे ९ नोव्हेंबर रोजी स्व. शाहुराव देशमुख साहित्य नगरीत १६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उत्साहात पार पडणार आहे. या संमेलनाचे आयोजन मराठी साहित्य मंडळ (ठाणे) या संस्थेच्या वतीने करण्यात आले असून, राज्यभरातील नामांकित साहित्यिक, कवी, संशोधक आणि सामाजिक कार्यकर्ते या साहित्य महोत्सवात सहभागी होणार आहे. साहित्यप्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी साहित्य मंडळाच्या वतीने जिल्हाध्यक्ष त्र्यंबकराव देशमुख व तालुका प्रमुख पै. नाना डोंगरे यांनी केले आहे.

संमेलनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार असून, स्वागताध्यक्ष म्हणून आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ काम पाहत आहे. कार्यक्रम स्थळ म्हणून नगर–पुणे रोडवरील स्नेहांकुर येथे असलेली स्व. शाहुराव देशमुख साहित्यनगरी निवडण्यात आली आहे. या संमेलनाच्या तयारीसाठी जिल्हा आणि तालुकास्तरावर मराठी साहित्य मंडळाचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार असून, या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गिरीश कुलकर्णी (स्नेहालय प्रमुख), ज्ञानदेव पांडुळे (रयत शिक्षण संस्था), प्राचार्य शिवाजीराव भोर, मेधाताई काळे, अनिल मोहिते, भूषण देशमुख, संजय बंदिष्टी, जयकुमार मुनोत, आनंद कटारिया, माजी नगरसेवक सुनिलमामा कोतकर, अमोल येवले आदी उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाच्या आयोजन समितीत राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर, संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ कादंबरीकार दशरथ यादव (पुणे), राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. घनःशाम पांचाळ, महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. विनायकराव जाधव, उपाध्यक्ष डॉ. सुदर्शन धस, अनिताताई काळे, तालुकाध्यक्ष नानासाहेब डोंगरे यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता स्वागतगीताने होईल. अनिताताई काळे यांनी लिहिलेल्या गीताने उद्घाटन सत्र रंगणार आहे. काव्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ कवी डी. आर. बांगर (लोणार, बुलढाणा) आणि काव्यस्पर्धा प्रमुख राजेश थळकर (अलिबाग, रायगड) असतील. ३० कवींच्या कविता सादर होतील व त्यातून प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच दोन उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जातील.

प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ कवयित्री संगीता बढे (हिंगणघाट) उपस्थित राहणार आहेत. साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात पावसाची कथा आणि शेतकऱ्यांची व्यथा या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे. या परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. बालाजी राजूरकर (बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट) असतील, तर प्रमुख वक्ते डॉ. संजय मेस्त्री (आबासाहेब मराठे कॉलेज, राजापूर, रत्नागिरी) असतील.

या संमेलनात विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. यामध्ये वैद्यकभूषण पुरस्कारः डॉ. हेमंतकुमार अकोलकर (राजापूर), डॉ. निर्मला दरेकर (अहिल्यानगर), ग्रंथभूषण पुरस्कारः तृप्ती सुभाष आंब्रे (पिंपरी, पुणे), समाजभूषण पुरस्कारः लीना आढे, नानासाहेब डोंगरे, सरोज आल्हाट (अहिल्यानगर), विद्याभूषण पुरस्कारः अनिताताई काळे (अहिल्यानगर), साहित्यभूषण पुरस्कारः ओंकार कुचेकर (पुस्तक सकारात्मक विचार आनंदाची रोपटी), पद्मनाथ हिंगे (पुस्तक शाल्मली), व्यंकट पाटील (कादंबरी कोब्रा) यांचा समावेश आहे.

संमेलनाच्या यशस्वीतेसाठी डॉ. गिरीश कुलकर्णी (स्नेहालय संस्था) यांनी विनामूल्य हॉल व जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांनी त्यांचे आभार मानले आहेत. कार्यक्रमाच्या नियोजनात जिल्हाध्यक्ष त्र्यंबकराव देशमुख, उपाध्यक्ष डॉ. सुदर्शन धस, अनिताताई काळे, सचिव बबनराव खामकर, तालुका प्रमुख नानासाहेब डोंगरे, आशाताई शिंदे, सलिमभाई आतार, भिमराव घोडके, सरोज आल्हाट, गितराम नरोडे, हरिश्चंद्र दळवी आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले आहेत. संमेलनाचे निवेदन संदीप रासकर करणार आहेत.

### आ. जगताप यांना ‘विशेष निमंत्रण’

संमेलनाच्या पूर्वतयारीनिमित्त आयोजक मंडळाने आमदार संग्राम जगताप यांची विशेष भेट घेऊन त्यांना कार्यक्रमाचे आमंत्रण दिले. त्यांच्या हस्तेच या साहित्य संमेलनाचे उद्घाटन होणार असून, मराठी साहित्याच्या परंपरेचा उत्सवमय सोहळा अहिल्यानगरात रंगणार आहे.

# श्री शंभुकलश काव्य संस्था व सामाजिक प्रतिष्ठानतर्फे नगरमध्ये ९ नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय कवी संमेलन

नगर – श्री शंभुकलश काव्यसंस्था व सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संस्थेचे पहिले राज्यस्तरीय कवी संमेलन अहिल्यानगर येथे ९ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनासाठी उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय बोरुडे, संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व्याख्याते चंद्रकांत (दादा) वानखेडे तसेच स्वागताध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक नागेश शेलार असतील तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक तसेच शब्दगंध साहित्यिक परिषदेचे संस्थापक सचिव सुनील गोसावी, माजी पोलिस अधिकारी कवी सुभाष सोनवणे, ग्रामीण कवी आनंदा साळवे, ज्येष्ठ कवयित्री रंजनताई बोरा, जेष्ठ कवयित्री सुनिताताई वाळुंज हे उपस्थित राहणार आहेत अशी माहिती नवनाथ पोकळे, संस्थेचे संस्थापक कवी संदिप पाचारणे यांनी दिली आहे.

संस्थेचे पहिले राज्यस्तरीय कवी संमेलन पार पडणार असून संमेलनाचे ठिकाण, हॉटेल यश पॅलेस, सक्कर चौक अहिल्यानगर येथे असून छत्रपती श्री संभाजीराजे आणि कवी कलश यांच्या साहित्याचा वारसा सांगून मायमराठीच्या सेवेसाठी सर्व कवींना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी या राज्यस्तरीय संमेलनाचे आयोजन केले आहे. संस्थेचे अध्यक्ष कवी महादेव लांडगे, कार्याध्यक्ष कवी देविदास थोरात, उपाध्यक्ष कवी संजय शेळके, सचिव कवी बाळासाहेब घोरपडे, संस्थेचे संघटक अनिकेत औसरमल, सहसचिव कवी विश्वेश्वर बोडखे, प्रसिद्धी प्रमुख अक्षय विधाते याच्या उपस्थितीत हे संमेलन पार पडेल. या संमेलनात राज्यभरातून विविध जिल्ह्यातून येणारे कवी निवृत्ती एकनाथ पाचपोर, बुलढाणा, कवी विजय भद्रीगे, पुणे, कवी चंद्रकांत घाडगे सातारा, कवी किशोर पांचाळ पुणे, कवी राज्याच्या विविध शहरातून व गाव खेड्यातून कवी येथे येणार आहे. यात संजय पातुरकर, कवी संतोष तावडे, कवी गोकुळ गायकवाड, अहिल्यानगर कवी दादासाहेब पठारे, बीड, कवी शिवराज कृष्णा अहिल्यानगर, कवी अशोक उघडे पुणे, कवी रुपचंद शिदोरे. अहिल्यानगर, डॉ. दत्ता ठुबे छत्रपती संभाजीनगर, कवी चंद्रकांत नरटे, धाराशिव, कवी मोहन वाकचौरे. नाशिक, कवी उमेश गोरे. पुणे, कवी वैजनाथ जाधव, नांदेड, कवयित्री दिव्या लोंढे, पुणे, कवयित्री सारिका नळकांडे. पुणे, कवयित्री अलका खोसे. पुणे, कवी संतोष कपाळे, लोणार सरोवर, कवी नाथकुमार घोलवाड. छत्रपती संभाजीनगर, कवी सुनिल थोरात, कवी दशरथ बावस्कर जालना, कवी संभाजी दराडे. अहिल्यानगर, कवी बाळासाहेब रोहोकले. अहिल्यानगर, कवी नागोराव सोनकुसरे, नागपूर, कवी बाबासाहेब ढोबळे बारामती, कवी निवृत्ती महाराज, कानवडे, अहिल्यानगर, कवी शांतीलाल ननवरे पुणे, कवी गोविंद पाठक, बीड, कवी सार्थक बेडके. राजापूर, कवयित्री आशा लोंढे, पुणे, कवी सचिन चव्हाण अहिल्यानगर, प्रा. मकरंद पाटील, जळगाव, कवी एकनाथ पवार रत्नागिरी, कवी सुनिल केकाण, अहिल्यानगर, कवी. डी आर बांगर, बुलढाणा, कवी दिनेश चव्हाण छत्रपती संभाजीनगर, कवी दत्तात्रय वरकड, अहिल्यानगर कवयित्री कावेरी पगारे, नाशिक आदी कवींचा तसेच दुबई येथून खास कवी शंकर शिंदे यांचा संमेलनात समावेश असणार आहे. साहित्य प्रेमी काव्य रसिक श्रोत्यांनी या संमेलनास उपस्थिती दर्शवावी असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी व संपर्कासाठी ९६०४५७१५७५ / ८१४९८३१९०० या क्रमांकावर संपर्क साधावा.

# राज्य बालनाट्य स्पर्धा हायजॅक झाली हा फक्त प्रसिध्दीसाठी केलेला कांगावा

मुंबई – बालरंगभूमी परिषद ही अखिल भारतीय नाट्य परिषदेशी संलग्न असल्यामुळे बालकांच्या भावविश्वाशी व कलागुणांशी संबंधित काम या संस्थेमार्फत चालत असते. त्यामुळेच बालनाट्य स्पर्धेत बालरंगभूमीने विना मोबदला स्थानिक आयोजनात सहकार्य आणि समन्वय करावे असे बालरंगभूमी परिषद बरोबरच्या बैठकीत ठरले होते. त्यानुसार ४ ऑगस्ट २०२५ रोजी बालरंगभूमी परिषदेस तसे पत्रही देण्यात आले होते. या पत्रानुसार समन्वयक नावे सुचवणे, परीक्षक नावे सुचवणे याबरोबरच अन्य काही बाबीसाठी बालरंगभूमी परिषदेने सहकार्य करावे असे नमूद करण्यात आले होते. बालरंगभूमी परिषदेने परिक्षकांची व समन्वयांची नावे सुचवली असली तरी, अंतिम निवड सांस्कृतिक कार्य संचालनालयाची आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे बालरंगभूमी परिषदेस दिलेल्या पत्रामुळे काही माध्यमांमधून या पत्रांमधील काही मुद्द्यांवर आक्षेप घेण्यात आलेले होते. वास्तविक पाहता या पत्रामध्ये बालरंगभूमी परिषदेने स्पर्धा आयोजनात स्थानिक सहकार्य करावे आणि स्थानिक समन्वय करावा असे अभिप्रेत आहे, याचा अर्थ महाराष्ट्र राज्य हौशी बाल नाट्य स्पर्धा हायजॅक केली असा होत नाही. या पत्रामध्ये स्पष्टपणे बालरंगभूमी परिषदेने स्थानिक आयोजन सहकार्याने समन्वय करावा असे नमूद करण्यात आलेले होते. मात्र निवेदनाद्वारे काही संस्थानी ही स्पर्धा संपूर्ण आयोजनाकरीता दिली आहे असे म्हटले होते. स्पष्ट करण्यात येते की, यामध्ये काहीही तथ्य नाही. कारण कोणत्याही संस्थेस शासनाने ही स्पर्धा संपूर्णपणे आयोजन करण्यासाठी दिलेली नाही. या स्पर्धेदरम्यान स्थानिक सहकार्य आणि समन्वय करण्यासाठी बालरंगभूमी ही शासनास पुर्वीपासून मदत करत होती व यापुढेही मदत करेल अशी अपेक्षा आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या निर्णयाचा काही संस्थांनी विपर्यास केला तसेच या सदर्भात केलेल्या खुलासाचा नोंदणीकृत नसलेल्या एका रंगभूमी कलावंत संघटनेंने श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. तसेच राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांने देखील श्रेय घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते, हे सांस्कृतिक चळवळीसाठी बाधक आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालयाने कोणत्याही संस्थेच्या किंवा राजकीय पक्षाच्या/संघटनेच्या राजकीय दबावाखाली बळी पडून हा निर्णय घेतलेला नाही. गेली अनेक वर्षे सांस्कृतिक कार्य संचालनालय विविध संस्थांची मदत घेऊन विविध स्पर्धा आयोजित करीत असते. त्यामुळे स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी कोणीही गैरसमज पसरवू नये. सदरील स्पर्धा पूर्णपणे पूर्वीपासूनच शासनाच्या नियंत्रणाखाली आहे. कोणत्याही खाजगी संस्थेला याचे अधिकार दिलेले नाहीत. त्यामुळे पूर्वीपासून शासनाच्या वतीने स्पर्धेचे नियोजन करण्यात येत असते, तसे यावर्षी देखील होणार आहे.

